
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५




# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष विसावे / अंक १ / जानेवारी २०१९

## संपादकीय

### वसाहतवाद (Colonization) आणि कालगणना



CALENDARIVM
GREGORIANVM
PERPETVVM.

Orbi Christiano vniuerso à Gregorio XIII. P. M. propositum. Anno M. D. LXXXII.

GREGORIVS EPISCOPVS
SERVVS SERVORVM DEI
AD PERPETVAM REI MEMORIAM.

पोप ग्रेगरीयांची नविन दिनदर्शिकेच्या अंमलबजावणीची आज्ञा.

१ जानेवारी हा आधुनिक दिनदर्शिकेचा (कॅलेंडर) पहिला दिवस. जानेवारी ते डिसेंबर अशा १२ महिन्यांमध्ये ही दिनदर्शिका विभागली गेली आहे. आपले सर्व व्यवहार या दिनदर्शिकेप्रमाणे होतात. या दिनदर्शिकेला फारसा वैज्ञानिक आधार नाही. पोप ग्रेगरी १३ वे यांनी या आधीच्या दिनदर्शिकेमध्ये सुसूत्रता आणण्याकरता विद्वानांना पाचारण केले, आणि त्यात सुधारणा करून आजची दिनदर्शिका अस्तित्वात आली. १५ ऑक्टोबर १५८२ मध्ये या सुधारित दिनदर्शिकेचा स्वीकार केला गेला.

पाश्चात्य संस्कृती, त्यांच्या संस्कृतीचा उगम हा रोमन व ग्रीक संस्कृतीत असल्याचे मानते. अर्थातच २००० वर्षांपूर्वी रोमन संस्कृतीची जी दिनदर्शिका होती त्यामध्येही वास्तव परिस्थिती आणि दिनदर्शिका यामध्ये तफावत यायला लागली. म्हणून जूलीयस सिझर यांनी ख्रिस्तपूर्व ४६ साली त्यामध्ये सुधारणा केली. म्हणून त्याला 'ज्यूलीयन' दिनदर्शिका (कॅलेंडर) म्हणून संबोधले जाते. हाच प्रकार १६ व्या शतकात घडल्यानंतर पोप ग्रेगरी यांनी त्या कालमापनामध्ये सुसूत्रता आणली व त्यामुळे त्याला 'ग्रेगरी' दिनदर्शिका म्हटले जाते.

पोप ग्रेगरी यांच्या सुधारणेनंतरही सर्व ख्रिस्ती जगताने त्याचा अवलंब केला नव्हता. ग्रेगेरियन दिनदर्शिकेमध्ये ज्यूलियन दिनदर्शिके मधील ११ दिवस काढून टाकण्यात आले होते.

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

आजही रशियामधील ऑर्थोडॉक्स चर्च ज्यूलीयन दिनदर्शिका वापरते. अफगाणिस्तान व इराणमध्ये सौर हिजरी दिनदर्शिका वापरतात. इथोपियाची दिनदर्शिका वेगळी आहे. नेपाळमध्ये विक्रम संवत् आजही वापरले जाते. तरीही जवळजवळ ९९% जग हे 'ग्रेगेरियन' दिनदर्शिकेचाच वापर करते.

दिनदर्शिकेचा वापर हा प्रामुख्याने धार्मिक विधी, सण यांच्याकरता केला जायचा. साहाजिकच जुलीयन काय किंवा ग्रेगेरियन काय, या दिनदर्शिकेच्या रचनेमध्ये ख्रिस्ती धर्मीय सण आणि उत्सव यांचा प्रभाव आहे. कालमापनामध्येही आपण AD, किंवा BC यांचा जो वापर करतो त्याचा संबंधही ख्रिस्तजन्माशी आहे. BC म्हणजे ख्रिस्तपूर्व, अर्थात Before chirst हे इंग्रजीमध्येही म्हटले जाते. तथापि AD म्हणजे Anno Domini अशा लॅटीन शब्दांनी उच्चारले जाते. Anno Domini म्हणजे (The year Jesus wars born) ख्रिस्तजन्माचे वर्ष. यातल्या ख्रिस्ती संदर्भाला बगल देण्याकरता आजकाल AD च्या जागी CE म्हणजे Common Era आणि BCE म्हणजे Before Common Era म्हणून संबोधले जाते. अर्थातच यामुळे आधुनिक दिनदर्शिकेचा ख्रिस्तीधर्माशी असलेल्या संबंधामध्ये फारसा फरक पडत नाही.

या दिनदर्शिकेच्या महिन्यांची नावेही बहुतांशी रोमन व ग्रीक देवतांशी निगडित आहेत. रोमन देवता 'जानस्' (Janus) यावरून जानेवारी महिन्याचं नाव पडलं. रोमन उत्सव 'Februa' वरून फेब्रुवारी महिना आला. रोमन युद्धदेवता 'मार्स' यावरून मार्च महिना आला. ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर मात्र पूर्वीच्या रोमन दिनदर्शिकेतील ८, ९, १० व्या या अर्थाच्या लॅटीन शब्दांवरून आले आहेत.

स्वातंत्र्यानंतर भारतामध्येही वेगवेगळे प्रांत व पंथांची मिळूण जवळजवळ २५ ते ३० पंचांग/ दिनदर्शिका होत्या. त्यामध्ये सुसूत्रता आणण्याकरता मेघनाद साह यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासकांची एक समिती नेमण्यात आली. त्यांनी या सर्व दिनदर्शिकांचा व आधुनिक वस्तुस्थितीचा सांगोपांग अभ्यास करून, परंपरेचाही आदर राखून, 'शालिवाहन शके' दिनदर्शिका तयार केली. सरकारी राजपत्रानी त्यावर आपली मोहर उमटवली. आकाशवाणीने तशी बातमीही प्रसृत केली. चैत्र शुद्ध प्रतिपदा, शके १८७९ म्हणजे आधुनिक दिनदर्शिकेप्रमाणे, २२ मार्च १९५७ साली या सुधारीत भारतीय दिनदर्शिकेला सुरुवात झाली. यामध्ये परंपरागत कालगणना आणि ग्रेगेरियन दिनदर्शिकेचा मेळ घालण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. दुर्दैवाने आजही काही सरकारी अध्यादेश सोडले तर त्याचा वापर कुठेच दिसत नाही. तसा प्रामाणिक प्रयत्नही कुठल्याच स्तरावर होताना दिसत नाही.

कुठल्याही संस्कृतीमध्ये कालगणना ही असावीच लागते. बाबीलोनियन, ग्रीक, रोमन या सगळ्या सभ्यतांमध्ये कालमापनाची पद्धती होती. त्या बहुतांश दिनदर्शिकांचा संबंध हा आकाशस्थ ग्रहतारे, नक्षत्रांशी होता. वर सांगितल्याप्रमाणे या सगळ्याचा वापर हा त्या त्या सभ्यतांचे धार्मिक उत्सव, आणि सण साजरे करण्याकरता प्रामुख्याने होत असे. काही शतकांमध्ये आकाशस्थ ग्रहांची परिस्थिती बदलते, आणि प्रत्यक्ष नक्षत्र किंवा ग्रहस्थिती, व वास्तवातील सण किंवा उत्सव यामध्ये तफावत यायला लागते. जुलीयनपासून ग्रेगेरियनपर्यंत, आणि भारतामधील अनेक पंचांगांच्या निर्मितीमध्ये झालेले बदल हे, वास्तव आणि आकाशस्थ ग्रहांची परिस्थिती या मधील तफावतीत सुधारणा करण्याकरता केले गेले आहेत.

यातूनच भारतामध्ये ग्रहगणिताचा उगम झाला. यांच्या इतिहासावर आज अनेक ग्रंथ तर उपलब्ध

(पृष्ठ क्र.४० वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

**वर्ष विसावे/अंक ७/जानेवारी २०१९**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २३ वे/अंक ७ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | व्यक्तीवेध-१०: सर चंद्रशेखर व्यंकट रमण | श्री. नरेंद्र गोळे | ३ |
| ३) | मोक्षदायिनी - उज्जयनी | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | ६ |
| ४) | कलम ३५ (अ) चा नेमका गोंधळ काय? | डॉ. शैलेंद्र देवळाणकर | १३ |
| ५) | शेअरबाजाराचे मन आणि मनातला शेअरबाजार | श्री. चन्द्रशेखर टिळक | १६ |
| ६) | इंटुकल्या - पिंटुकल्यांच्या देशात ... | अपर्णा कुलकर्णी | २० |
| ७) | आधुनिक स्त्रीच्या समस्या | गौरी अंबाजी परब | २२ |
| ८) | मकरसंक्रांत | डॉ. शैलजा धर्माधिकारी | २४ |
| ९) | श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे जन्मस्थान - डुबेरे | श्री. चंद्रशेखर बर्वे | २६ |
| १०) | चंपाषष्ठी | डॉ. शैलजा धर्माधिकारी | २८ |
| ११) | परिसर वार्ता | संकलित | ३१ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# व्यक्तीवेध-१०: सर चंद्रशेखर व्यंकट रमण

*भारतीय शास्त्रज्ञ सर चंद्रशेखर व्यंकट रमण ह्यांनी 'रमण प्रभावा'चा शोध लावला. त्यासाठी त्यांना भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिकही मिळाले व ह्याच कार्यासाठी त्यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च सन्मानही प्रदान करण्यात आला अशा या थोर शास्त्रज्ञाचा अल्पपरिचय या लेखात करून देण्यात आला आहे- संपादक*

२८ फेब्रुवारी १९२८ रोजी भारतीय शास्त्रज्ञ सर चंद्रशेखर व्यंकट रमण ह्यांनी 'रमण प्रभावा'चा शोध लावला १. त्याकरता त्यांना १९२९ साली 'सर' ही उपाधी मिळाली. १९३० साली त्याकरताच त्यांना भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिकही मिळाले आणि ह्याच कार्यासाठी १९५४ साली त्यांना 'भारतरत्न'हा सर्वोच्च सन्मानही प्रदान करण्यात आला. २. त्या स्मृतीस उजागर करण्यासाठी२८ फेब्रुवारी हा दिवस दरसाल 'विज्ञान दिवस' म्हणून साजरा करावा अशी शिफारस राष्ट्रीय विज्ञान व तंत्रज्ञान संचार परिषदेने १९८६ साली केली होती. तत्कालीन भारत सरकारने तिचा स्वीकार करून आपल्या देशात १९८७ सालापासून २८ फेब्रुवारी हा दिवस दरसाल 'विज्ञान दिवस' म्हणून साजरा करावा अशी प्रथा सुरू केली आहे. पहिला राष्ट्रीय विज्ञान दिवस २८ फेब्रुवारी १९८७ रोजी साजरा करण्यात आला.

**विज्ञान दिवस साजरा करण्याचा उद्देश**

१. जनसामान्यांत विज्ञानाचे महत्त्व अधोरेखित करणे,

२. लोकांच्या दैनंदिन जीवनास समृद्ध करण्यातील विज्ञानाचा फार मोलाचा वाटा लोकांच्या नजरेस आणून देणे,

३. मनुष्यजातीच्या उन्नयनार्थ सुरू असलेल्या विज्ञान क्षेत्रातील कार्यांची, प्रयासांची आणि श्रेयांची जनसामान्यांना ओळख करून देणे,

४. शास्त्रविकासार्थ नवतंत्रांचा वापर करणे आणि त्यावर चर्चा घडवून आणणे,

५. नागरिकांना विज्ञान अंगिकारण्यासाठी प्रोत्साहन देऊन नवीन संधी उपलब्ध करून देणे.

शाळा, महाविद्यालयांतील विद्यार्थी ह्या दिवशी निरनिराळ्या प्रकल्पांची प्रात्यक्षिके सादर करतात. प्रश्न मंजुषांत भाग घेतात. निरनिराळ्या संकल्पनांवरील व्याख्याने, दूरदर्शनवरील परिसंवाद, वैज्ञानिक प्रदर्शने, प्रात्यक्षिके, वादविवाद, परिचर्चा आयोजित केल्या जातात.

'रमण प्रभाव' हा वर्णपट-दर्शन-शास्त्रातील (म्हणजे स्पेक्ट्रोस्कोपीतील) एक आविष्कार आहे. रमण ह्यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी तो सर्वप्रथम शोधून काढला. म्हणून ह्या प्रभावास त्यांचेच नाव देण्यात आले आहे. त्यावेळी ते असोसिएशन फॉर कल्टिव्हेशन ऑफ सायन्स, कोलकाता येथे संशोधन कार्य करत होते.

जेव्हा प्रकाश शलाका एखाद्या धूळविरहित, पारदर्शी संयुगाच्या नमुन्यातून पार होत असते,त्या वेळी त्या संयुगातील रेणूंमुळे तिच्यातील थोडासा प्रकाश आपाती प्रकाशाच्या दिशेव्यतिरिक्त इतर दिशांतून विखुरला जात असतो. त्या विखुरलेल्या बहुतांशी प्रकाशाची तरंग-लांबी, मूळ आपाती प्रकाशाच्या तरंग-लांबीएवढीच असते. मात्र त्यातील थोड्याशा प्रकाशाची तरंग-लांबी, मूळ आपाती प्रकाशाच्या तरंग-लांबीहून वेगळी असते. तरंग-लांबीत घडून येणाऱ्या ह्या बदलालाच रमण प्रभाव असे संबोधले जात असते.

ज्याला गुन्हा माहीत नसतो, त्याला भीतीही ठाऊक नसते! - ओव्हिड

भारतीय शास्त्रज्ञ सर चंद्रशेखर व्यंकट रमण ह्यांचे अल्प चरित्र (नोबेल परिचयातून)

http://www.nobelprize.org/nobel_prizes physics/ laureates/1930/raman-bio.html



जन्मः ७ नोव्हेंबर १८८८, तिरुचिरापल्ली
मृत्यूः २१ नोव्हेंबर १९७०, बंगळुरू

चंद्रशेखर व्यंकट रमण ह्यांचा जन्म ७ नोव्हेंबर १८८८ रोजी,दक्षिण भारतातील तिरुचिरापल्ली येथे झाला. त्यांचे वडील गणित आणि भौतिकशास्त्राचे व्याख्याते होते. त्यामुळे ते सुरुवातीपासूनच शैक्षणिक वातावरणात बुडालेले होते. १९०२ साली त्यांनी मद्रास येथील प्रेसिडन्सी कॉलेजात प्रवेश घेतला. १९०४ साली ते बी.ए. प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. पारितोषिक म्हणून त्यांना सोन्याचे पदक प्राप्त झाले. १९०७ साली त्यांना एम.ए. ही पदवी सर्वोच्च विशेष प्राविण्यांसह प्राप्त झाली.प्रकाशशास्त्र आणि ध्वनीवहनशास्त्रातील त्यांचे सुरुवातीचे प्रयोग त्यांनी विद्यार्थीदशेतच केले होते. ह्याच शास्त्रशाखांच्या तपासात त्यांनी पुढे आपले सारे आयुष्य वाहून टाकले.

त्या काळी शास्त्रीय कारकीर्दीत सर्वोत्तम संभावना दिसून येत नसल्याने, रमण १९०७ साली इंडियन फायनान्स डिपार्टमेंटमध्ये रुजू झाले. कार्यालयातील त्यांचे कामच त्यांना बहुतांश वेळ पुरत होते, तरीही, इंडियन असोसिएशन फॉर द कल्टिव्हेशन ऑफ सायन्स ऍट कोलकाता येथील प्रयोगशाळेत संशोधन करण्याची संधीही त्यांना मिळाली होती. ह्याच संस्थेचे ते १९१९ मध्ये सन्माननीय सचिव झाले.

१९१७ मध्ये त्यांना,कोलकाता विद्यापीठातील नव्यानेच प्रस्थापित 'पलित चेअर ऑफ फिजिक्स' देऊ करण्यात आली आणि त्यांनी तिचा स्वीकार केला. कोलकोत्यात १५ वर्षे राहिल्यानंतर ते इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगळुरू येथे प्राध्यापक झाले (१९३३–१९४८). १९४८ पासून त्यांनीच स्थापन केलेल्या'रमण इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च, बंगळुरू येथे ते संचालक राहिले. ह्याशिवाय १९२६ मध्ये त्यांनी इंडियन जर्नल ऑफ फिजिक्सचीही स्थापना केली होती. त्याचे सुरुवातीचे संपादकही तेच होते. इंडियन ऍकॅडेमी ऑफ सायन्सेसची स्थापनाही त्यांनीच प्रायोजित केली होती आणि सुरुवातीला त्यांनीच तिचे अध्यक्षपदही भूषविले होते. त्या ऍकॅडेमीच्या प्रोसिडिंग्जनाही त्यांनीच सुरुवात केली. त्यातच त्यांचे बहुतेक कामही प्रकाशित झाले. भारतातून करंट सायन्स प्रकाशित करणाऱ्या करंट सायन्स असोसिएशन, बंगळुरूचेही ते अध्यक्ष आहेत.

रमण ह्यांच्या सुरुवातीच्या काही आठवणी इंडियन असोसिएशन फॉर द कल्टिव्हेशन ऑफ सायन्स मध्ये बुलेटिन्सच्या स्वरूपात प्रकाशित झाल्या होत्या (बुले.६ व ११, 'स्पंदांचा सांभाळ'– मेंटेनन्स ऑफ व्हायब्रेशन्स, बुले. १५,१९१८, व्हायोलिन कुटुंबातील वाद्यांच्या सिद्धांतांबाबत). १९२८ मध्ये 'हँडबूक डर फिजिक'च्या ८–व्या खंडात त्यांनी वाद्यांचा सिद्धांत लिहिला होता. १९२२ मध्ये त्यांनी'प्रकाशाचे रेण्वीय विवर्तन' हे त्यांचे

कार्य प्रकाशित केले. त्यांच्या सहकार्यांसोबत केलेल्या तपासकामांच्या मालिकेतील हे पहिले होते. अंतिमतः ह्यातूनच पुढे त्यांचा २८ फेब्रुवारी १९२८ रोजी प्रकाशित झालेला प्रारण प्रभावाचा शोधही लागला होता, ज्याला पुढे त्यांच्याच नावाने ओळखले जाऊ लागले (‘एक नवीन प्रारण’-‘A new radiation’, इंडियन जर्नल ऑफ फिजिक्स, २ (१९२८) ३८७). ह्या संशोधनाखातरच त्यांना पुढे १९३० सालचे भौतिकशास्त्राकरताचे नोबेल पारितोषिकही प्राप्त झाले होते.

रमण ह्यांनी केलेले इतर तपास पुढीलप्रमाणे आहेत. अधोश्राव्य (हायपरसॉनिक) आणि ऊर्ध्वश्राव्य (अल्ट्रासॉनिक) वारंवारितांच्या ध्वनीलहरींद्वारे घडवून आणलेल्या प्रकाश विवर्तनावरचे त्यांचे प्रायोगिक व सैद्धांतिक अभ्यास (प्रकाशनकाल-१९३४ ते १९४२) आणि सामान्य प्रकाशाच्या संसर्गात स्फटिकांतील अवरक्त स्पंदांवर क्ष-किरणांचे होणारे प्रभाव. १९४८ मध्ये,रमण ह्यांनी नव्या पद्धतीने स्फटिकांच्या वर्णपट वर्तनांचा अभ्यास करून स्फटिक गतीशास्त्राच्या समस्यांचा तपास केला. त्यांची प्रयोगशाळा,हिर्यांची संरचना आणि गुणधर्म ह्यांचा अभ्यास करत आहे. असंख्य प्रस्फुरक (इर्रिडिसेंट सब्स्टन्सेस- लॅब्राडोराईट,पिअर्ली फेल्स्पार,अगाटे,ओपल आणि पर्ल्स) पदार्थांची संरचना आणि प्रकाशशास्त्रीय वर्तन ह्यांबाबत कार्य करत असते.

साख्यांचे (कोलाईडस) प्रकाशशास्त्रीय वर्तन,विद्युत् आणि चुंबकीय सदीश वर्तन आणि मानवी दृष्टीचे शरीरशास्त्र ह्या विषयांतही त्यांना स्वारस्य होते.

रमण ह्यांना मोठ्या संख्येने सन्माननीय पदव्या आणि वैज्ञानिक समाजांचे सदस्यत्व प्राप्त झालेले होते. त्यांच्या कारकीर्दीच्या सुरुवातीसच ते रॉयल सोसायटीचे सन्माननीय सदस्य निवडले गेले होते. १९२९ साली त्यांना’सर’ही पदवी प्राप्त झाली होती.

हा उतारा ‘फिजिक्स-१९२२-१९४१’ ह्या, ऍम्स्टरडॅम येथील, एल्सेव्हिअर पब्लिशिंग कंपनीने १९६५ साली प्रकाशित केलेल्या, ग्रंथातील ‘नोबेल लेक्चर्स’ ह्या पाठातून घेतलेला आहे. हे चरित्र पारितोषिकाचे प्रदान समयी लिहिले गेले आहे आणि ह्याचे प्रथम प्रकाशन ‘लेस प्रिक्स नोबेल’ मध्ये झालेले आहे. नंतर संपादित करून ‘नोबेल लेक्चर्स’ ह्या पाठात ते पुनर्प्रकाशित करण्यात आले. ह्या दस्ताचा उल्लेख करताना, नेहमीच, वरीलप्रमाणे स्रोतास नमूद करावे.

**संदर्भः**

१. राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शन परिषदेचे अधिकृत संकेतस्थळ
g.http://ncsm.gov.in/?p=3430

२. टाईम्स ऑफ इंडिया दैनिकातील विज्ञान दिवसाबद्दलची माहिती
https://timesofindia.indiatimes.com/topic/national-science-day

३. विकिपेडियावरील संबंधित मजकूर
https://en.wikipedia.org/wiki National_Science_Day

**- नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

•••

*दिशा संपर्क दूरध्वनी*
**०२२-२५४२ ६२७०**

झऱ्यांचे नदीत रूपांतर होते आणि नद्या समुद्राकडे वाहत जातात; वाईट सवयींचेही असेच आहे. - ओव्हिड

# मोक्षदायिनी - उज्जयनी

*हिंदू धर्मीयांचे पवित्र मोक्षदायी शहर उज्जैनच्या माहात्म्याविषयी माहिती देणारा लेख - संपादक*

उज्जैन येथील महाकालेश्वराचे मंदिर प्राचीन असल्याचे मत अभ्यासकांचे आहे. तज्ज्ञांच्या मते, प्राचीनकालीन संस्कृत महाकवी कालिदासाने आपल्या 'मेघदूतम्' या संस्कृत काव्यात महाकालेश्वराच्या मंदिराचे वर्णन केले आहे हे आपण पाहिलेच आहे. कालिदासाने काव्याप्रमाणेच संस्कृत नाटकेदेखील लिहिली होती. कालिदासाचा काल हा इसवीसनाचे ४ थे ते ५ वे शतक असावे असे सर्वसाधारण मत आहे. कालिदासाने आपल्या जीवनातील विविध टप्पे काश्मीर, उज्जैन व कलिंग (सध्याचे ओडिशा हे राज्य) येथे व्यतीत केले असावेत असा मतप्रवाह आहे. वर म्हटल्याप्रमाणे कालिदासाने आपल्या 'मेघदूत' या काव्यात उज्जैनविषयी उल्लेख केला आहे. 'मेघदूत' हे एकशे अकरा (१११) कडव्यांचे दिर्घ काव्य असून ही कविता म्हणजे एका यक्षाचे आपल्या कैलास पर्वतावरील अलकापुरीतील पत्नीविषयी प्रेम प्रकट करणारे सुंदर काव्य होय. ही कथा अशी की, आपल्या कर्तव्यांकडे दुर्लक्ष केल्यामुळे धनसंपत्ती व समृद्धीचा देव कुबेर आपल्या एका यक्षास अलकापुरीतून एकवर्षासाठी हद्दपार करतो. तेव्हा हा यक्ष मध्य भारतात येऊन राहतो. पत्नी विरहामुळे तो व्याकुळ होतो व उज्जैन शहरावरून उत्तर दिशेने जाणाऱ्या मेघास (ढगास) अलकापुरीतील आपल्या पत्नीस आपल्या म्हणजेच त्याच्या (यक्षाच्या) भावना व्यक्त करण्याची व निरोप देण्याची विनंती करतो. 'मेघदूत' काव्यप्रकारास अभ्यासकांनी 'संदेश काव्य' असे म्हटले आहे. १८१३ साली होरॅस हेमन विल्सन (Horace Hayman Wilson) यांनी 'मेघदूताचे' इंग्रजी भाषांतर केले. होरॅस विल्सन (२६ सप्टेंबर १७८६ ते ८ मे १८६०) हे प्रसिद्ध 'ओरियन्टलिस्ट' होते. 'ओरियन्टलिस्ट' म्हणजे मध्यपूर्व, दक्षिण आशियाई व पूर्व आशियातील विविध देशांचा इतिहास व संस्कृतींचा अभ्यास करणारे अभ्यासक होत.

होरॅस विल्सन हे १८११ साली एशियाटिक सोसायटी ऑफ बंगालचे सचिव देखील झाले होते. १८१३ मध्ये होरॅस विल्सन यांनी कालिदासाच्या मेघदूताचे पहिले इंग्रजी भाषांतर प्रसिद्ध केले असे अभ्यासक म्हणतात हे आपण पाहिलेच आहे. होरॅस विल्सन यांनी १८१९ साली पहिला 'संस्कृत-इंग्रजी शब्दकोश' देखील बनविलेला आढळतो. एवढेच नव्हे तर त्यांना आयुर्वेदात देखील रस होता. तर या विल्सन साहेबांना कालिदासाची इंग्रजीच्या रुपाने संपूर्ण जगाला ओळख करून देण्याचे प्रथम श्रेय जाते असे म्हणणे वावगे ठरू नये. असो. मेघदूतामध्येच कालिदासाने महाकालेश्वर मंदिर व उज्जैन नगरीचे देखील वर्णन व उल्लेख केलेले आढळतात. कालिदास हा दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या दरबारातील नवरत्नांपैकी एक होता. कालिदासाने 'अभिजात शाकुंतलम्', 'मालविकाग्नीमित्र' आदी नाटके तर 'रघुवंश', 'कुमारसंभव', 'ऋतुसंहार', 'मेघदूत' इत्यादी काव्ये रचलेली आढळतात.

उज्जैनच्या एकंदरीत धार्मिक जीवनात शिप्रा नदीचे स्थान फार महत्त्वाचे आहे. याचे कारण शिप्रा नदीच्या तीरावर अनेक मंदिरे असून पवित्र स्नानासाठी विविध घाटदेखील आहेत. त्याचप्रमाणे उज्जैनमधील कुंभमेळा देखील शिप्रेच्या तीरावरच भरतो. शिप्रा नदीचा उगम विंध्य पर्वत रांगेत मध्य प्रदेशातील धार जिल्ह्याच्या

उत्तरेला होतो. ही नदी उत्तर वाहिनी असून ती मध्यप्रदेशातील मंडसोर जिल्ह्यात कलाखेरी येथे चंबळ नदीला जाऊन मिळते. स्कंद पुराणात अवंती खंडात शिप्रा नदीचा महिमा व माहात्म्य वर्णिलेले आहे. स्कंद पुराणात शिप्रेला व्यक्तिला पापमुक्त करणारी व व्यक्तीचे शुद्धीकरण करणारी पवित्र नदी म्हटले आहे. हिंदू धर्मातील विविध सण व उत्सवांच्या वेळी अनेक भाविक शिप्रेमध्ये पवित्र स्नानासाठी येत असतात. स्कंद पुराणात शिप्रेची विविध नावे दिली आहेत. ही नावे पुढीलप्रमाणे होत – ज्वरघाणी (ज्वर वा तापमुक्त करणारी), पापघाणी (पापमुक्त वा पापांचा नाश करणारी), अमृत संभव (अमृत निर्माण करणारी), स्वर्गीय शिप्रा–क्षिप्रा, विष्णुदेहोभव (भगवान विष्णुच्या शरीरापासून निर्माण झालेली). शिप्रा नदीच्या उगमाविषय अनेक पौराणिक कथा सांगितल्या जातात. यापैकी एक कथा एक अशी की, भगवान शिव डोक्याची कवटी घेऊन भिक्षा मागण्यासाठी भगवान विष्णुकडे गेले. तेव्हा भगवान विष्णुने भगवान शिवाला भिक्षा देण्याऐवजी आपली तर्जनी दाखविली. त्यामुळे क्रोधीत झालेल्या भगवान शिवाने आपल्या त्रिशूलाने भगवान विष्णुची तर्जनी कापली. त्यावेळी जेव्हा भगवान विष्णुचे रक्त निघाले ते भगवान शिवाच्या कवटीत पडू लागले व ती कवटी भरून भूतलावर पडले व त्यातूनच शिप्रा नदीचा उगम झाला अशी ही पौराणिक कथा आहे. ह्या कथेमुळेच शिप्रेला विष्णुदेहोभव म्हटले गेले असेल.

शिप्रेविषयीची अजून एक पौराणिक कथा अशी की, समुद्र मंथनाच्या वेळी क्षीरसागरातून हलाहल नामक जे विष निघाले ते विश्वाच्या भल्यासाठी महादेवाने म्हणजचे भगवान शिवाने ते प्राषन केले. भगवान शिवाने हलाहल प्राषन करून ते आपल्या कंठात ठेवले. त्यामुळे त्याचा कंठ विषामुळे निळा दिसू लागला व महादेवाला 'नीलकंठ' असे संबोधले गेले. त्यानंतर भगवान शिवाने ते विष समुद्राला परत करण्याचा निर्णय घेतला व कोणती नदी हलाहल समुद्रापर्यंत वेगाने घेऊन जाईल याची विचारणा केली. त्यावेळी कुठलीही नदी पुढे आली नाही. परंतु शिप्रा नदी म्हणाली की, ती हलाहल समुद्रापर्यंत घेऊन जाऊ शकते व त्यानुसार शिप्रेने हलाहल समुद्रापर्यंत वेगाने वाहून नेले. त्यामुळे देखील शिप्रेला शिप्रा म्हणजेच 'वेगवान' असे देखील म्हटले जाते.

शिप्रा नदीला गंगानदीप्रमाणेच हिंदू धर्मात अतिशय पवित्र स्थान आहे. कुंभमेळ्यादरम्यान तर शिप्रेत स्नान केल्यावर अमृत चाखल्याचे पुण्य प्राप्त होते असे म्हटले जाते. गंगादसरा, कार्तिकपौर्णिमा, वैशाखीपौर्णिमा, सूर्यग्रहण व चंद्रग्रहणाच्यावेळी शिप्रेत स्नान करण्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पुराणांनुसार नारद, भृगु, अंगिरास इत्यादी ऋषींनी शिप्रेचे पूजन व आराधना केल्याची माहिती मिळते. तसेच गंधर्व, वसू, आदित्य, आश्विनकुमार इत्यादींनीसुद्धा शिप्रेची मनोभावे पूजा केल्याची माहिती पुराणांमधून मिळते. कालिदास तसेच बाणभट्ट (सम्राट हर्षवर्धनाचा राजकवी) यांनी आपल्या साहित्य कृतींतून शिप्रेचा महिमा गायिलेला आहे. कार्तिक महिन्यात तर (हिंदू पंचांगाप्रमाणे आठवा महिना, हिंदू बारा महिने पुढीलप्रमाणे होत – चैत्र, वैशाख, ज्येष्ठ, आषाढ, श्रावण, भाद्रपद, आश्विन, कार्तिक, मार्गशीर्ष, पौष, माघ व फाल्गुन) शिप्रेच्या तीरावर अनेक धार्मिक विधी व पूजा केल्या जातात. शिप्रेच्या तीरावरचे काही महत्त्वाचे घाट पुढीलप्रमाणे आहेत – त्रिवेणी घाट – येथे त्रिवेणी नवग्रह मंदिर आहे. हे नावाप्रमाणे नवग्रहांचे मंदिर असून येथे प्रामुख्याने शनिवारी येणाऱ्या पौर्णिमेला भाविकांची मोठी गर्दी असते, शिप्रेवरील सर्वात महत्त्वाचा घाट म्हणजे रामघाट होय. रामघाटावर दररोज सायंकाळी पुरोहित व भटजी संध्याआरती करतात व आरतीदरम्यान फुलं, उदबत्ती, चंदन व कुंकवाने शिप्रेची पूजा करतात. रामघाटावरच दत्त आखाडा असून कुंभमेळ्यादरम्यान 'नागा' पंथीय साधूंचा येथे वावर असतो. रामघाटावर

पिशाच्चमुक्तेश्वर, गुहेश्वर, अरुणेश्वर, दुंडेश्वर, डमरुकेश्वर व अर्धनारीश्वराच्या प्रतिमा आहेत. नरसिव्ह घाट – येथे नरसिव्हाचे (भगवान विष्णूचा चौथा अवतार) ह्या अवतार रुपाने भगवान विष्णूने हिरण्यकश्यपू ह्या दैत्याचा वध केला होता. (नरसिव्हाचे तोंड सिंहाचे व शरीर मानवाचे असते व चक्र, गधा, सिंहनखे व सिंहमुख ही त्याची आयुधे/शस्त्रे होत). कुंभमेळ्यादरम्यान परमहंस संप्रदायाचे साधू हा घाट वापरत असतात अशी माहिती आपणास मिळते. गंधावती घाट येथे गंधावती नदी शिप्रेला येऊन मिळते वा त्यांचा संगम होतो. या घाटावर कामेश्वर, दुधेश्वर व करकटेश्वराचे मंदिर आहे. या घाटाजवळच अंगदकुंडदेखील आहे.

वर नमूद केलेल्या घाटांव्यतिरिक्त शिप्रेच्या तीरावर इतरही अनेक देव-देवतांची इतरही मंदिरे, तीर्थ व कुंडे आहेत. ही मंदिरे पुढीलप्रमाणे आहेत – भर्तीहारी गुहांजवळचे गडकालिका मंदिर. तसेच येथेच असलेले मत्स्येंद्रनाथाचे (मच्छिंद्रनाथ) मंदिर – मत्स्येंद्रनाथ 'नाथ' पंथाचा (एक शैव उपासना पंथ) संस्थापक मानला जातो व गोरखनाथ हा मच्छिंद्रनाथचा शिष्य मानला जातो. शिप्रेच्या पश्चिम किनाऱ्यावर सुनहरी घाटाजवळचे केदारेश्वर मंदिर-येथे एक धर्मशाळा देखील असून या धर्मशाळेत प्रामुख्याने कपालिक व अघोर हे शैवपंथीय साधू उतरलेले असतात. शवाचे (मृतदेहाचे) क्रियाकर्म व अग्निदेण्याच्या घाटानजीक चक्रतीर्थ असून येथे आनंदेश्वर, बटूकभैरव व दहा हात/भुजा असलेल्या विनायकाचे मंदिर आहे. शिप्रेच्या काठावरच काळभैरवाचे मंदिर असून येथेच विक्रांतभैरव असून पाताळभैरवीची गुहा आहे. हे ठिकाण व मंदिर तंत्र पंथियांसाठी फार महत्त्वाचे आहे. शिप्रेच्या तीरावर सिद्धवट नामक प्रचंड वटवृक्ष असून त्याची पूजा केली जाते. पंचवटीतील (नाशिक) वटवृक्षांचे जे धार्मिक माहात्म्य व स्थान आहे तसेच माहात्म्य या सिद्धवट वटवृक्षाचेसुद्धा आहे.

उज्जैनचे अजून एक धार्मिक महत्त्व म्हणजे हिंदू असे मानतात की, भगवान विष्णुचा आठवा अवतार असलेल्या भगवान श्रीकृष्णाचे गुरू सांदिपनी ऋषी यांचा आश्रम उज्जैनमध्येच शिप्रेच्या तीरावर होता. श्रीकृष्णाने महाभारताच्या युद्धात (कुरुक्षेत्राच्या युद्धात) पांडवांच्या विजयाच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका बजाविली व अर्जुनाला रणांगणावर दिव्यज्ञान सांगितले होते, ज्यास भगवद्गीता असे म्हटले जाते. श्रीकृष्णाचा मोठा भाऊ बलराम व त्याचा अतिशय जवळचा गरीब ब्राह्मण मित्र या तिघांनी सांदिपनी ऋषींच्या आश्रमात शिक्षणप्राप्ती केली होती अशी माहिती आपणास पुराणांतून मिळते. सांदिपनी आश्रमाच्या परिसरातच गोमती कुंड असून श्रीकृष्णाने आपल्या गुरूसाठी सर्व पवित्र नद्यांचे पाणी येथे आणले होते असे हिंदू मानतात. या कुंडाजवळच शुंग-कुशाण काळातील एक नंदीची मूर्ती आहे. सांदिपनी आश्रमातच एक शिवमंदिर असून येथे शिवलिंगाजवळ एक सरपटणारा नाग दाखविण्यात आला आहे. सर्वसाधारणपणे शिवलिंगाला गुंडाळलेल्या अवस्थेतल्या नागाचे शिल्प शिवमंदिरात साकारण्यात येते. परंतु येथे सरपटणाऱ्या नागाचा अपवाद आहे. वल्लभ संप्रदायाच्या भक्तगणांसाठी सांदिपनी आश्रम अतिशय महत्त्वाचे ठिकाण आहे. येथे एका वटवृक्षाखाली वल्लभाचार्यांनी ध्यानधारणा केली होती असे भक्तगण मानतात. भारतभरातून व प्रामुख्याने गुजरात तसेच महाराष्ट्रातून सांदिपनी आश्रमास अनेक भाविकपण भेट देत असतात. मंगलनाथ मंदिरात दर्शन घेतल्यावर भक्तगण सांदिपनी आश्रमात जात असतात.

उज्जैनमधील प्रसिद्ध अशा ८४ महादेव मंदिरांची नावे पुढीलप्रमाणे आहेत – अगस्थेश्वर, गुहेश्वर, दुंडेश्वर, डमरुकेश्वर, अनादी कल्पेश्वर, स्वर्णजल्लेश्वर, विष्टपेश्वर, कपालेश्वर, स्वर्गदारेश्वर, काकोटीश्वर, सिद्धेश्वर, लोकपालेश्वर, कामेश्वर, कुटुंबेश्वर, इंद्रधुमनेश्वर, ईशानेश्वर, अप्सरेश्वर, कालकलेश्वर,

नागचंद्रेश्वर, प्रतिहारेश्वर, कुक्कुटेश्वर, कुक्कुटेश्वर, मेघनादेश्वर, महालयेश्वर, मुक्तेश्वर, सोमेश्वर, आनरकेश्वर, जटेश्वर, रामेश्वर, चव्हाणेश्वर, खांदेश्वर, पट्नेश्वर, आनंदेश्वर, केठादेश्वर, इंद्रेश्वर, मार्कंडेश्वर, शिवेश्वर, कुसुमेश्वर, आकूरेश्वर, कुंडेश्वर, लुंपेश्वर, गंगेश्वर, अंगारकेश्वर, उत्तरेश्वर, त्रिलोचनेश्वर, वीरेश्वर, नूपुरेश्वर, अभयेश्वर, पिथुकेश्वर, स्थावरेश्वर, शुलेश्वर, ओमकारेश्वर, विश्वेश्वर, कंठेश्वर, सिंघेश्वर, रेवंतेश्वर, घंटेश्वर, प्रयागेश्वर, सिद्धेश्वर, मातंगेश्वर, सौभाग्येश्वर, रुपेश्वर, धनुसहस्रेश्वर, पशुपतेश्वर, ब्रह्मेश्वर, जल्पेश्वर, केदारेश्वर, पिशाच्चमुक्तेश्वर, संगमेश्वर, दुरधारेश्वर, प्रयागेश्वर, चंद्रादित्येश्वर, करभेश्वर, राजस्थलेश्वर, बदलेश्वर, अरुणेश्वर, पुष्पंदतेश्वर, अबीमुक्तेश्वर, हनुमक्तेश्वर, स्वप्नेश्वर, पिंगळेश्वर, कयवरोहणेश्वर, बिल्लेश्वर व दुरदुरेश्वर.

महाकालेश्वरप्रमाणेच उज्जैनमधील दुसरे प्रमुख मंदिर म्हणजे कालभैरवाचे (काळभैरव) मंदिर होय. या मंदिराचा आकार आयताकृती असून ते शिप्रा नदीच्या तीरावर आहे. काळभैरवाविषयीच्या विविध पौराणिक कथा सांगितल्या जातात. एका कथेनुसार धरुरासुर नावाचा एक आसुर होता. त्याचा मृत्यू फक्त स्त्रीच्या हातूनच होणार असल्याने माता पार्वतीने कालीमातेला बनविले. कालीमातेने धारुरासुराचा वध केला व तिच्या क्रोधाचे रूपांतर एका बालकात झाले. कालीमातेने त्या बालकाला स्तनपान केले. त्यानंतर भगवान शिवाने कालीमाता व त्या बालकास स्वतःशी एकरूप करून टाकले व त्यातूनच भैरवाची निर्मिती झाली. अजून एका कथेनुसार सती मातेच्या शवाचे / मृत शरीराचे विविध भाग जेथे पडले तेथे शक्तीपीठे निर्माण झाली व त्या शक्तीपीठांचे रक्षण करणारा तो काळभैरव होय.

काळभैरवाची पूजा प्रामुख्याने तंत्रपंथातील लोक करताना आढळतात. अर्थात या पंथाव्यतिरिक्त इतरही हिंदू भक्तगण काळभैरवाची पूजा करताना आढळतात. उज्जैनमधील सध्याचे काळभैरवाचे मंदिर इसवीसनाच्या १८ व्या शतकात भद्रसेन या राजाने बांधले असावे असे अभ्यासकांचे मत आहे. येथे आजही भारतभरातून व प्रामुख्याने गुजरात व महाराष्ट्रातून भाविक मोठ्या संख्येने येत असतात. येथे तंत्रपंथीय साधूदेखील सततपणे येत असतात. येथील काळभैरवाची मूर्ती एका अखंड शिळेपासून बनविलेली आहे. येथे काळभैरवाला मद्यार्पण करण्याची प्रथा असून हे मद्य काळभैरवाच्या मूर्तीच्या मुखातून अर्पण केले जाते. मद्य अर्पण केल्यावर कोठे जाते हे कुणासही कळत नाही. काळभैरव मंदिराच्या आवारात २१७ दीप असलेली दीपमाळ आहे. दिवाळी, नवरात्रौत्सव व महाशिवरात्रीच्या वेळी हे दीप प्रज्वलीत केले जातात. जसा भगवान शिवाशी नंदीचा व गणेशाशी मूषकाचा संबंध आहे तसाच काळभैरवाचा श्वानांशी संबंध आहे. तंत्र पंथीय भक्तगण व साधू येथे येत असतात व तंत्र पंथाचे धार्मिक विधी व पूजा प्रामुख्याने स्मशानात होत असतात. त्यामुळे काळभैरव मंदिराच्या पलीकडच्या तीरावर (शिप्रा नदीच्या) प्रेत जाळण्यासाठी स्मशान आहे. अगोदर उल्लेख केल्याप्रमाणे येथे अंगाला भस्म लावलेले तंत्र पंथीय साधू नेहमीच मोठ्या प्रमाणात येत असतात. महाशिवरात्रीच्या वेळेस तर काळभैरवाच्या मंदिरात भक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी असते. येथील मंदिराच्या एका दगडी फरशीवर अशा स्वरूपाची माहिती दिलेली आहे की,- या मंदिराचा जीर्णोद्धार व वाढीव बांधकाम कर्नाटकातील श्रीआदीचुंचनगिरी महासंस्थान मठाचे प्रमुख पवित्र जगद्गुरू श्रीश्रीश्री बालगंगाधरनाथ महास्वामीजी यांनी २९ एप्रिल २००४ रोजी दिलेल्या (दान म्हणून) बारा लाख रुपयांतून करण्यात आले. काळभैरव मंदिराचे एकंदरीत क्षेत्रफळ मोठे असून येथे पुरोहित व पुजाऱ्यांना निवासासाठीची व्यवस्था आहे. मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस भाविकांच्या गाड्या उभ्या करण्यासाठी जागा असून खरेदी करण्यासाठी

भक्तगण व पर्यटकांना अनेक लहान-सहान दुकाने आहेत.

उज्जैनचे अजून एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे प्राचीनकाळापासून हे शहर खगोलशास्त्र व ज्योतिषविद्येच्या अभ्यासाचे एक प्रमुख केंद्र होते. इसवीसनाच्या ६ व्या शतकातील प्रसिद्ध गुप्त सम्राट दुसरा चंद्रगुप्त ऊर्फ विक्रमादित्य याच्या दरबारातील नवरत्नांपैकी एक म्हणजे प्रसिद्ध खगोलतज्ज्ञ वराहमिहीर हा होता असे अभ्यासकांचे मत आहे. (दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या दरबारातील 'नवरत्ने' पुढीलप्रमाणे होती - अमरसिंह-संस्कृत भाषातज्ज्ञ/व्याकरणकार, शब्दकोशकार व कवी, धन्वंतरी-वैद्य, हरीसेन-याने अलाहाबाद स्तंभलेखातील समुद्रगुप्ताची प्रशस्ती लिहिली होते असे अभ्यासकांचे मत आहे, कालिदास-संस्कृत पंडित व कवी, कहपानक - ज्योतिषतज्ज्ञ, सांकू - स्थापत्यशास्त्रज्ञ, वराहमिहीर - खगोलतज्ज्ञ, वररुची - संस्कृत भाषातज्ज्ञ व व्याकरणकार, व वेताळभट्ट - जादूगार). वराहमिहिराच्या सर्वात प्रसिद्ध ग्रंथांपैकी तीन ग्रंथ म्हणजे 'पंचसिद्धांतिक', 'बृहत्संहिता' व 'बृहतजातक' हे होत. उज्जैनमधून कर्कवृत्त जाते याची कल्पना आपल्या पूर्वजांना प्राचीन काळातही होती. त्यामुळेच येथे पूर्वीपासून खगोल व ज्योतिषशास्त्राचा अभ्यास केला जात असे. आजही उज्जैनमध्ये मोठ्या संख्येने ज्योतिषशास्त्राचे अभ्यासक आढळतात, किंबहुना हे ज्योतिषशास्त्राच्या अभ्यासाचे मोठे केंद्र आहे. येथून कर्कवृत्त जात असल्यामुळे उज्जैनला 'भारताचे ग्रीनिज' असे देखील म्हटले जाते.

हिंदू संस्कृतीमध्ये आठवड्यातील वेगवेगळ्या दिवशी एका विशिष्ट देवतेची पूजा करण्याची पद्धत आहे. अमूक एक वार अमूक देवतेचा व त्या दिवशी त्या देवतेची मंदिरात जाऊन पूजा करण्याची ही पद्धत आहे. उदाहरणार्थ, सोमवार भगवान शिवाचा, मंगळवार विद्येच्या देवतेचा व बुद्धीची देवता गणपतीचा, बुधवार पांडुरंगाचा, गुरुवार दत्तात्रयाचा, शुक्रवार संतोषी मातेचा, शनिवार हनुमानाचा तर रविवार महाराष्ट्रातील प्रसिद्ध लोकदेवता खंडोबाचा. या विविध वारांच्या दिवशी त्या त्या विशिष्ट देवतेच्या मंदिरात जाऊन हिंदू भाविक मोठ्या मनोभावे त्या देवतेची पूजा करत असतात. त्यामुळे प्रत्येक वारी वा दिवशी भारतभर कुठल्या ना कुठल्या मंदिरात भाविकांची रीघ चालूच असते. त्यामुळे फुलवाले, उदबत्ती विक्रेते, पूजेची साधन-सामग्री विकणारे इत्यादी लोकांच्या उपजीविकेची साधने म्हणजे ही मंदिरे होत यात वाद नाही. दर सोमवारी भगवान शिवाच्या विविध मंदिरांच्या आसपास अनेक लोक बेलफुलं विकताना दिसतात. दर मंगळवारी व विविध चतुर्थींच्या दिवशी गणपतीच्या मंदिरानजीक अनेक लोक दूर्वा विकताना दिसतात. दर शनिवारी हनुमानाच्या मंदिरांजवळ रुईच्या पानांच्या माळा विकून आपला उदरनिर्वाह करणारे अनेक लोक आहेत. यातून फक्त एक मुद्दा स्पष्ट करावयाचा आहे व तो असा की, भारतातील विविध मंदिरांमुळे अनेक लोकांना उपजीविकेचे साधन मिळवून देण्यास मदत झाली आहे. भारतातील विविध देवस्थाने व अनेक शहरे जशी की, माहूर, पंढरपूर, तिरुपती, रामेश्वरम्, काशी, पुरी, उज्जैन इत्यादी ठिकाणी तर तेथील स्थानिक लोक पूजा-अर्चेचे सामान विकून तसेच भक्तगणांची राहण्याची व खाण्याची सोय करून अर्थार्जन करत असतात. त्यामुळे प्राचीन काळापासून भारतातील मंदिरे, देवालये व पवित्र तीर्थस्थळांचा भारतीय अर्थव्यवस्थेत फार मोठा हातभार व सहभाग आहे असे म्हणणे वावगे ठरू नये. श्रावण महिन्यासारख्या पवित्र महिन्यात तर अनेक लोक पूजेसाठी लागणारे साहित्य विकून आपली उपजीविका चालवत असतात.

वरील विवेचनावरून उज्जैन व उज्जैनसारख्या इतर मंदिरांच्या नगरींचे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात येते. या नगरीतील मंदिरांमुळे स्थानिक लोकांना अर्थार्जसाठीचा व स्वयंरोजगाराचा मोठा मार्ग वा स्रोत उपलब्ध करून

दिला आहे असे म्हणणे म्हणजे अतिशयोक्ती ठरू नये.

उज्जैन म्हटले म्हणजे अगोदर नमूद केल्याप्रमाणे आपणास आठवण होते ती, तेथील अनेक मंदिरांची हे आपण पाहिलेच आहे. भारतातील बरीचशी शहरे मंदिरांची शहरे म्हणून प्रसिद्ध आहेत. अशाच पवित्र शहरांपैकी, 'मंदिरांचे शहर' (City of Temples) म्हणजे उज्जैन होय. उज्जैन शहरात अनेक देव-देवतांची मंदिरे असून गेल्या कित्येक शतकांपासून हिंदू भाविक भक्तिभावाने या मंदिरांमध्ये दर्शनासाठी येत आहेत. प्रत्येक धर्मियांचे आपापले प्रार्थनास्थळ असते. ख्रिस्ती बांधवांच्या प्रार्थनास्थळाला चर्च, मुस्लिम बांधवांच्या प्रार्थनास्थळाला मशीद, पारसी (झोरोस्ट्रीयन) बांधवांच्या प्रार्थनास्थळाला अग्निमंदिर (Fire Temples) तर ज्यू बांधवांच्या प्रार्थनास्थळाला सिनेगॉग म्हणतात. ह्या ज्या चार धर्मांचा येथे उल्लेख केला आहे त्या धर्मांचे वैशिष्ट्य म्हणजे या धर्मांचे उगमस्थान भारताबाहेर आहे. ख्रिस्त धर्माचा व मुस्लिम धर्माचा उगम अरबस्तानात झाला तर झोरोस्ट्रियन धर्माचा उगम प्राचीन पर्शिया म्हणजेच सध्याच्या इराणमध्ये इसवीसनापूर्वी साधारणतः ६ व्या शतकात झाला. असो. भारतभूमीत जन्माला आलेले तीन प्रमुख धर्म म्हणजे हिंदूधर्म, जैनधर्म व बौद्धधर्म होत. यापैकी हिंदूधर्म हा सर्वात प्राचीन असून इसवीसनापूर्वीच्या ६ व्या शतकात उत्तर भारतात (सध्याचा उत्तर प्रदेश व बिहार) महावीर जैन व महात्मा गौतम बुद्ध यांनी अनुक्रमे जैन व बौद्ध धर्माची शिकवण दिली व प्रसार देखील केला अशी माहिती आपणास मिळते. बौद्ध बांधवांचे प्रार्थनास्थळ म्हणजे बौद्धविहार होय तर जैन धर्मिय जैनमंदिरामध्ये जाऊन आराधना करत असतात. हिंदू धर्मियांचे प्रार्थनास्थळ म्हणजे मंदिर होय. हिंदू बांधव नित्यनेमाने विविध देवतांच्या मंदिरात जाऊन देवाची आराधना व पूजाअर्चा करत असतात. विविध सणांच्यावेळी तर मंदिरांमध्ये विशेष पूजेचे व दर्शनाचे आयोजन केले जाते. हिंदू धर्माचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे हिंदू धर्मीय विविध देवदेवतांची पूजा व उपासना करत असतात. त्यामुळेच हिंदू धर्मामधील देवतांची संख्या तेहतीस कोटी आहे असे म्हटले जाते. अर्थात, सद्यस्थितीत भारतात सर्वात जास्त प्रमाणात ज्यांची आराधना व पूजा होते ते देव म्हणजे भगवान शिव व भगवान विष्णू होत. भगवान विष्णूचे श्रीराम व श्रीकृष्ण हे दोन अवतार तर जनमानसात कायमस्वरूपी घर करून बसलेले आहेत. श्रीराम व श्रीकृष्णाची मंदिरे संपूर्ण भारतभर आहेत. महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकात प्रसिद्ध असलेला भगवान विष्णूचा एक अवतार म्हणजे विठोबा होय. अठरापगड जातीचे श्रद्धास्थान असलेल्या ह्या विठूमाउलीचे मंदिर सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर येथे आहे. गेली अनेक शतके भक्तगण मोठ्या भक्तीभावाने पंढरपूरला येत असतात. दरवर्षी आषाढी व कार्तिकी एकादशीला तर येथे वैष्णवांचा व प्रामुख्याने वारकऱ्यांचा मनमोहक मेळा भरत असतो. भगवान शिवाची देखील संपूर्ण भारतभर मंदिरे आहेत. प्राचीन काळापासून अनेक राजघराण्यांनी शैव व वैष्णव या पंथांचा स्वीकार करून भगवान शिव व भगवान विष्णूची सुंदर स्थापत्यशैलीत भारताच्या विविध भागांत मंदिरे बांधलेली असल्याचे आपल्या निदर्शनास येते. भगवान शिवाप्रमाणेच माता पार्वतीच्या विविध अवतारांची प्रामुख्याने दुर्गामातेची व कालीमातेची अनेक मंदिरे संपूर्ण भारतभर आढळतात. माता लक्ष्मी, गणपती व कार्तिकेय या इतर काही देवता होत ज्यांची मंदिरे आपणास भारतात अनेक ठिकाणी आढळतात. यात भगवान कार्तिकेयाच्या मंदिरांविषयीचे एक निरीक्षण नोंदवावेसे वाटते व ते हे की, कार्तिकेयाची मंदिरे आपणास प्रामुख्याने दक्षिण भारतात आढळतात.

हिंदू धर्मातील मंदिर संस्कृतीमुळे व विविध वारी वेगवेगळ्या देवतांची पूजाअर्चा करण्याच्या पद्धतीमुळे अनेक सणांच्या दिवशी व प्रत्येकवारी कुठल्या ना कुठल्या मंदिरात भाविकांची दर्शनासाठी गर्दी झालेली दिसते.

जो दुसऱ्याचे गुण जाणतो, त्यालाच खऱ्या सुखाची गुरुकिल्ली लागली असे समजावे. - गटे

त्यामुळे अशा मंदिरांच्या ठिकाणी अनेक फुलवाले उदबत्तीवाले व पूजेची इतर साधनसामग्री विकणारे लोक फुले या वस्तू विकून आपली उपजीविका चालवित असतात. हे हिंदू समाजाचे एक वैशिष्ट्य आहे. यातून अनेक लोकांना स्वयंरोजगार मिळाल्याचे आपल्या निदर्शनास येते. हे आपण अगोदर पाहिलेलेच आहे. याबाबतीत आपल्या ठाण्यातीलच उदाहरण द्यावयाचे तर लोहार आळीत अनेक फुलवाल्यांची दुकाने आढळतात. तसेच लोहार आळी व स्टेशन रोड (अशोक सिनेमा ते जांभळीनाका) दरम्यान पूजेची साधनसामग्री विकणारी दुकाने आढळतात. त्याचप्रमाणे कौपीनेश्वर मंदिरामुळे दर सोमवारी याच रस्त्यावर पूजेच्या वस्तू विकणारे अनेक स्त्री-पुरुष विक्रेते आढळतात. श्रावण महिन्यात तसेच महाशिवरात्रीच्या वेळी व इतर सणांच्यावेळी तर मोठ्या प्रमाणात हे पूजेचे सामान विक्रेते येथे आढळतात. तसेच भारतातील प्रत्येक हनुमान मंदिरांत दर शनिवारी भाविकांची गर्दी आढळते व तेथे प्रामुख्याने महाराष्ट्रात तरी रुईच्या पानांची माळ विकणारे लोक असतात. या माळा विकून त्यांचा उदरनिर्वाह होत असतो. संपूर्ण भारतभर अशी अनेक मंदिरे आहेत व तेथे पूजेची साधनसामग्री निघून उदरनिर्वाह करणाऱ्यांची संख्या हजारो नव्हे तर लाखोंनी तर निश्चितच आहे. या सर्वबाबतचे विस्तृत विवेचन आपण अगोदर केलेच आहे.

भारतात विविध ठिकाणे - जशी उज्जैन, काशी, हरद्वार, माहूर, तिरुपती, कांचीपूरम्, पीठापूर, कुंम्बकोनम्, मदुराई इत्यादी देवस्थानांसाठी प्रसिद्ध आहेत व येथील बहुसंख्य लोक पूजाअर्जेचे सामान विकून, भाविकांना भाड्याने गाड्या देऊन (देवस्थानेच दर्शन घेण्यासाठी), हॉटेल्स् चालवून (भाविकांसाठी) आपली उपजीविका कमावीत असतात. त्यामुळे भारतातील मंदिरे म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेची बलस्थाने असून ती नकळतपणे लाखो लोकांना स्वयंरोजगार तर पुरवितातच; परंतु सोबतच राष्ट्रीय ऐक्याचे देखील काम करत असतात. कारण उत्तरेकडील तीर्थक्षेत्रांना दक्षिणेकडील भाविक मनोभावे भेटी देत असतात. तर दक्षिणेकडील तीर्थस्थळांना उत्तरेकडील भाविक दर्शनासाठी भेट देत असतात. अशा प्रकारे भारतातील वेगवेगळ्या भागातील हिंदू विविध भागांतील पवित्र स्थळांना भेट देत असताना दिसतात. त्यामुळेच तर असे म्हटले जाते की, काशीमध्ये उत्तर प्रदेशातील लोक कमी व भारतातील इतर प्रदेशांतील लोकच जास्त असतात. या मंदिर संस्कृतीमुळे व हिंदूंच्या विविध सणांमुळे लोक आपले जातीय व पंथीय भेद विसरून एकत्र येऊन आनंदाने व उत्साहाने आपले सण साजरे करताना आढळतात. यातून जातीय सलोखा देखील निर्माण होतो जो आपल्या देशाच्या ऐक्यासाठी व अखंडतेसाठी आवश्यक आहे. परंतु आपण आपले सण साजरे करताना ते ध्वनीप्रदूषणामुळे व अनावश्यक मिरवणुकांमुळे वाहतूक कोंडी होऊन बीभत्स होणार नाहीत याची देखील काळजी घेणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**


- इंडिया - सेक्रेड जॉग्रफी - डायना एल्. येक
- इंडिया - अ हिस्ट्री फ्रॉम द अर्लियस्ट - जॉन की सिव्हिलायझेशन्स टू द बूम ऑफ द व्टेंटी फर्स्ट सेंच्युरि
- उज्जैन - द सिटी ऑफ टेम्पल्स : डॉ. एम्. के पाल
- विश्वकोश : खंड - २
- भारतीय संस्कृतिकोश : प्रथम खंड



**- सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com


●●●

# कलम ३५ (अ) चा नेमका गोंधळ काय?

*जम्मू आणि काश्मीरमध्ये 'कलम ३५ अ' वरील वादंग हे महत्त्वाचे कारण आहे. त्यामुळे नेमके हे कलम काय आहे हे जाणून घेणे औचित्याचे ठरेल. या संदर्भात ज्येष्ठ परराष्ट्र धोरण विश्लेषक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांचा लेख - संपादक*

जम्मू आणि काश्मीरमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा पहिला टप्पा हा सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात पार पडला. त्यामध्ये नगरपालिका व नगर परिषदांच्या निवडणुका झाल्या. दुसरा टप्पा हा नोव्हेंबर महिन्यामध्ये आहे. त्यामध्ये पंचायत समित्यांच्या निवडणुका होणार आहेत. या दोन्ही निवडणुकांवर नॅशनल कॉन्फरन्स आणि पीडीपी तसेच हुर्रियत या पक्षांनी बहिष्कार टाकला आहे. त्यांच्या बहिष्कारामागे कलम ३५ अ वरील वादंग हे महत्त्वाचे कारण आहे. त्यामुळे नेमके हे कलम काय आहे हे जाणून घेणे औचित्याचे ठरेल.




कलम ३५ (अ)चे दोन पैलू आहेत. एक आहे घटनात्मक, तर दुसरा आहे मानवाधिकाराचा. हे दोन्ही पैलू समजून घेण्यासाठी मुळात हे कलम समजून घेऊ या. आपण भारतीय राज्यघटना वाचायला घेतल्यास १ ते ३४ ही कलमे सर्व मूलभूत अधिकारांसंदर्भातील आहेत. राज्यघटनेच्या भाग-३ मध्ये कलम ३५ (अ) कुठेही दिसत नाही. कारण ते परिशिष्टात टाकण्यात आलेले आहे. त्यामुळे मूळ राज्यघटनेत ते दिसत नाही. परिशिष्टामध्ये या कलमाचा समावेश १९५४ मध्ये झाला. जून १९५४ मध्ये तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी एक अधिसूचना काढून हे कलम परिशिष्टामध्ये समाविष्ट केले आहे. इतकेच नव्हे तर, त्याचा संबंध भारतीय राज्यघटनेतील कलम ३७० शी लावण्यात आला आहे.

कलम ३५ (अ)नुसार जम्मू काश्मीर मधील निवासींना काही विशेषाधिकार दिले गेले आहेत. या कलमांतर्गत जम्मू-काश्मीरच्या विधानसभेला जम्मू काश्मीरचे स्थायी निवासी कोण याची व्याख्या ठरवण्याचा अधिकार दिला गेला आहे. त्याचबरोबर हे स्थायी नागरिक वगळता उर्वरित लोकांना जम्मू आणि काश्मीरच्या नागरिकत्वापासून परावृत्त करण्याचे मूलभूत अधिकार तेथील विधानसभेला देण्यात आले आहेत. या कलमाने जम्मू-काश्मीरच्या नागरिकांना एक विशेष अधिकार दिला गेला आहे. हा अधिकार आहे संपत्ती खरेदी करण्याचा. त्यानुसार तेथील विधानसभेने निर्धारित करून दिलेल्या लोकांनाच जम्मू-काश्मीरमध्ये संपत्ती खरेदी करता येते. इतर भारतीयांना तेथे कोणत्याही प्रकारची संपत्ती खरेदी करता येत नाही. अर्थात, हिमाचल प्रदेश, ईशान्य भारतातही हाच कायदा लागू आहे.

त्यामुळे तिथेही उर्वरित भारतीयांना संपत्ती खरेदीचा अधिकार नाही.

**वादळ का उठले?**

३५ अ कलम हे प्रामुख्याने कलम ३७० शी जोडले जाते. ही दोन्ही कलमे ही जम्मू काश्मीरच्या भारतातील विलिनीकरणाच्या पूर्व अटी आहेत. ज्यावेळी राजा हरिसिंगांचा भारताबरोबर करार झाला त्यावेळी जम्मू-काश्मीरमधील केवळ परराष्ट्र धोरण, संरक्षण आणि संवाद या तीनच गोष्टींबाबत भारत सरकार हस्तक्षेप करू शकेल आणि उर्वरित गोष्टींबाबत निर्णय घेण्याचे सर्वाधिकार तेथील विधानसभेला असतील असे निर्धारित करण्यात आले. यासंदर्भात एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घ्यायला हवी की, विलिनीकरणाची पूर्वअट म्हणून ही दोन्ही कलमे आलेली नाहीत. किंबहुना तसा दावा करणेच मुळात चुकीचे आहे. कारण जम्मू-काश्मीरचे भारतात विलिनीकरण झाले ते १९४७ मध्ये. ३७० हे कलम राज्यघटनेत १९४९ साली समाविष्ट केले गेले. म्हणजेच या कलमाची तरतूद ही काश्मीरच्या विलिनीकरणानंतर २ वर्षांनी केली गेली. भारताची राज्यघटना १९५० पासून अंमलात आली. परंतु कलम ३५ (अ) हे १९५४ मध्ये समाविष्ट करण्यात आले. त्यामुळे परिशिष्टातील ३५अ चा संबंध कलम ३७० शी जोडणेच मुळात चुकीचे आहे.

या कलमामुळे भारतात दोन राज्यघटना निर्माण झाल्यासारखे चित्र निर्माण झाले आहे. एक आहे ती भारतातील सर्वच नागरिकांना मूलभूत अधिकार प्रदान करते. दुसरी राज्यघटना आहे ती भारतीयांना संपत्ती विकत घेण्याच्या मूलभूत हक्कांपासून वंचित ठेवते. एकाच पद्धतीने विरोधाभासी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे हा मुद्दा निश्चितच महत्त्वाचा आहे.

कलम ३५ (अ) हे राष्ट्रपतींच्या अध्यादेशातून आणले गेले. १९२७ मध्ये असलेल्या स्टेट सब्जेक्ट ॲक्टला लागू करण्यासाठी हा अध्यादेश काढला गेला. हा कायदा १९२७ सालापासून जम्मू-काश्मीरचे निवासी कोण हे सांगणारा आहे. राष्ट्रपतींच्या अध्यादेशाने तो प्रत्यक्षात लागू झाला. भारतीय राज्यघटनेमध्ये केलेला हस्तक्षेप म्हणून या कलमाकडे पाहिले जाते. वास्तविक पाहता, भारतीय राज्यघटनेत कोणत्याही प्रकारची सुधारणा करायची असेल तर त्याचा अधिकृत मार्ग एकच आहे, तो म्हणजे कलम ३६८. या कलमानुसारच राज्यघटनेत बदल करता येतात, नवीन कलमे समाविष्ट करण्यात येतात. तथापि, कलम ३५ (अ) हे या कलमानुसार समाविष्ट झालेले नाही. त्यामुळेच ते परिशिष्टात टाकण्यात आले.

कलम ३५ (अ) परिशिष्टात समाविष्ट करण्यात आले तेव्हा केशवानंद भारती खटला सुरू नव्हता. १९७४ सालच्या या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय दिला. या खटल्यानुसार भारताच्या राज्यघटनेची मूलभूत संरचना ठरवण्यात आली. त्यानुसार, भारतीय राज्यघटनेतील धर्मनिरपेक्षवादाचे तत्त्व किंवा भारतीय राज्यघटनेच्या उपोद्घात यामध्ये कोणतेही बदल करता येणार नाहीत. तो संविधानाचा मूलभूत ढाचा असेल. या मूलभूत संरचनेच्या अंतर्गत ज्या गोष्टी आहेत त्यामध्ये कलम ३६८ नुसारही कोणतेही बदल अथवा सुधारणा करता येणार नाहीत. १९५४ मध्ये आलेले कलम ३५ (अ) हे मात्र भारतीय राज्यघटनेची मूलभूत संरचना नष्ट करणारे आहे. कारण त्यामुळे नागरिकांच्या संपत्ती खरेदी करण्याच्या मूलभूत अधिकारांचा संकोच होतो. या पार्श्वभूमीवर केशवानंद भारती ह्या खटल्याच्या सुनावणीनंतर हे कलम आपोआपच रद्दबातल व्हायला हवे होते. मात्र तसे झाले नाही. ३७० कलमही तसेच राहिले. वास्तविक, राजा हरिसिंग यांनी केंद्र सरकारबरोबर इन्स्ट्रुमेंटेशनल

ॲक्सेशन जम्मू-काश्मीर सरकारची विधानसभा मान्य करणार नाही तोपर्यंतच ३७० कलम कायम राहील, असे म्हटले होते. जम्मू-काश्मीरची विधानसभेने इन्स्ट्रुमेंटेशन ॲक्सेशन मान्य केल्यानंतर हे कलम रद्द होईल असे म्हटले होते. याचाच अर्थ हे कलम तात्पुरते होते; पण आज ७० वर्षांनंतरही कलम ३७० आणि कलम ३५ (अ) ही दोन्हीही कलमे टिकून आहेत.

यामध्ये मानवाधिकारांचाही एक पैलू आहे. जम्मू काश्मीरमधील महिलेने उर्वरित भारतातील कोणत्याही नागरिकाशी विवाह केला तर तिला संपत्तीतून बेदखल करण्याची तरतूद कलम ३५ अ मध्ये आहे. या तरतुदीला उच्च न्यायालयात आव्हान दिले गेले. २००२ मध्ये या संदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय दिला गेला. त्यानुसार काश्मीरी महिलेने काश्मीरबाहेरच्या पुरुषाशी लग्न केले तरीही तिचे संपत्तीचे अधिकार अबाधित राहातील असा निकाल देण्यात आला; तथापि, याविरोधात जम्मू-काश्मीर सरकारने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. वास्तविक हा महिलांचा मूलभूत अधिकार आहे. महिलांना अधिकार मिळाला पण इतर भारतीयांशी लग्न केलेल्या महिलांच्या अपत्यांना आईच्या संपत्तीमध्ये अद्याप अधिकार नाहीए. त्यांची संपत्ती आईकडून मुलांकडे हस्तांतरीत होत नाही. आपली संपत्ती मुलांकडे हस्तांतरित न होणे हे महिलांच्या मुलभूत अधिकारांवर गदा आणणारेच आहे. पण तिच्या मुलांवरही अन्याय करणारा आहे. मानवअधिकाराचे हे उल्लंघन आहे.

जम्मू आणि काश्मीरमध्ये १९५० मध्ये सफाई कामगारांनी फार मोठ्या प्रमाणात संप पुकारला होता. हा संप पुकारला तेव्हा सफाई कामासाठी पंजाबमधून वाल्मीकी समाजातील काही लोकांना आणले गेले. त्यांना कंडिशनल सिटीझनशिप देण्यात आली. जम्मू काश्मीर विधानसभेने काही अटी टाकून त्यांनी एक जमीन दिली. ही अट घृणास्पद होती. त्यानुसार सफाई काम करण्यासाठी आणलेल्या वाल्मीकी समाजातील लोकांच्या पुढच्या पिढ्यांनाही केवळ सफाईचेच काम करावे लागेल, त्यांना इतर कोणताही दुसरा व्यवसाय करता येणार नाही. ही बाबही मानवाधिकारांचे उल्लंघन आहे. पिढ्यानपिढ्या वाल्मीकी समाजाने हेच काम करायचे अशी अट आधुनिक लोकशाहीमध्ये घालणे हे चुकीचे आहे. त्यामुळे वाल्मरकी समाजाच्या मूलभूत अधिकारांचा प्रश्नही या ३५ अ कलमामुळे निर्माण झाला आहे.

तिसरी गोष्ट म्हणजे १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले तेव्हा पश्चिम पंजाबमधून २ लाख निर्वासित पंजाबी लोक काश्मीरमध्ये आले. हे निर्वासित आजही काश्मीरमध्येच राहतात. गेल्या ७० वर्षांपासून तिथे वास्तव्य असूनही त्यांना संपत्तीचे अधिकार नाहीत. ते भारताच्या लोकसभेसाठी मतदान करू शकतात; मात्र ते विधानसभेसाठी, पंचायत निवडणुकांसाठीही मतदान करू शकत नाहीत. हा मोठा विरोधाभास आहे. जम्मू-काश्मीरमधील या एक टक्का नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होत आहे.

एकूणच या प्रश्नात घटनात्मक आणि मानवाधिकाराचे पैलू विचारात घ्यावे लागतील. राष्ट्रपती अध्यादेशाने हे कलम अस्तित्त्वात आले असले तरी हा काही एकमेव राष्ट्रपती अध्यादेश नाही. जम्मू-काश्मीर विविध कायद्यांनुसार भारताच्या अख्त्यतारीत आणले आहे. त्यासाठी ९० राष्ट्रपती अध्यादेश काढले गेले आहेत. त्यामुळे ३५ अ काढून टाकल्यास अन्य अध्यादेशही काढून टाका असा दावा केला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे यासंदर्भात एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घ्यावी लागेल. मागील काळात काश्मीरमध्ये तीन इंटरलोक्युटर्स गेले होते. त्यांनी एक महत्त्वाची सूचना केली होती. जम्मू-काश्मीरमध्ये आत्तापर्यंत जे

(पृष्ठ क्र.२५ वर)

# शेअरबाजाराचे मन आणि मनातला शेअरबाजार

*शेअरबाजार आणि मन या दोन्ही गोष्टींतले साम्य सांगणारा चंद्रशेखर टिळक यांचा लेख - संपादक*

शेअरबाजार आणि मन या दोन्ही गोष्टींत कमालीचे साम्य आहे. कधी, कुठे धावतील हे त्यांचे त्यांना तरी माहीत असते की नाही कोण जाणे! हे त्यांच्यातले पहिले साम्य. या दोन गोष्टींवर कधी, कशाचा, किती परिणाम होईल हे अचूकपणे कोणाच्याही बापाला कधीही सांगता येणार नाही, सातत्याने तर नाहीच नाही; हे त्यांच्यातले दुसरे साम्य. आणि या दोन गोष्टी कोणत्या बाबींचा कोणाशीही कसला आणि कसा संबंध जोडतील हे सांगता येत नाही आणि येणारही नाही; हे त्यांच्यातले तिसरे साम्य. (अशी अजूनही अनेक साम्यस्थळे असतीलही; पण मला तरी आता इतकीच आठवत आहेत. खरं म्हणजे, लक्षात आली आहेत.)

आता हेच बघा ना ... कालच एका वर्तमानपत्रात एक वाक्य वाचले .. Deciding what not to do is as important as deciding what to do हे वर्तमानपत्र वाचायला सुरुवात करण्याआधी नुकतेच फ्रेडरिक फोरसिथचं The Fox हे पुस्तक लागोपाठ दुसऱ्यांदा वाचून पूर्ण केले होते.

या दोन गोष्टींच्या आदल्याच दिवशी (२९ ऑक्टोबर २०१८ रोजी) आपल्या मुम्बई शेअरबाजाराचा निर्देषांक ७०० हून जास्तच अंशांनी वाढला होता.

तसा तो त्याआधीचे गेले कित्येक दिवस तुफान वेगाने खाली येत होता. (दक्षिणायन किंवा उत्तरायण म्हणून उगाचच वाद नको.) आता या ४ गोष्टींचा एकमेकांशी काय संबंध आहे ? काहीही नाही.

पण मनाने तो आणि तसा संबंध लावायला सुरुवात केली ना!

हे म्हणजे ना आकाशातील ढगांचा आकार (संगणकीय क्षेत्रातील Cloud नाही.) शोधण्यातला प्रकार आहे. आपल्या मनात असतो तस्साच त्यावेळी तो वाटतो; पण प्रत्यक्षात तो तसा असेलच असे नाही ना !

ढगांचा आकार ठरवायचा नाही आणि शेअरबाजाराची कारणमीमांसा करायची नाही हे पक्के ठरवावेच लागते. Deciding what not .....

हे जरी खरं असलं तरी जुन्या सवयी पटकन मोडत नाहीत ना! नाहीतच. उगाचच का म्हणलंय Old habbits die hard ...

आता गेले काही आठवडे एकंदरीत खाली येणारा निर्देषांक गेल्या कित्येक वर्षांतली सर्वोच्च अशी दिवसभरातली ७०० अंशाहून जास्त वाढ अचानक दाखवतो, त्याला काय म्हणायचे ? असं काय झाले होते अचानक ? काय आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाचे भाव baral मागे ५० डॉलर वर आले ? केंद्र सरकार आणि रिझर्व बँक सूरज बडजात्याच्या सिनेमासारखे 'हम साथ साथ हैं' म्हणू लागले? सर्वोच्च न्यायालयाने अयोध्येत केंद्र सरकारने पुढच्या दोन महिन्यांत न्यायप्रविष्ट (वादग्रस्त म्हणलेले नाही) राम मंदिर बांधून पूर्ण करा असा निकाल दिला?, की विरोधक मागणी करतात त्याप्रमाणे प्रत्येक भारतीय नागरिकाच्या खात्यात मोदी सरकारने १५ लाख रुपये जमा केले ? यातलं काहीही

झालेले नाही. तसं खरं म्हणजे एका दिवसात कधीच, काहीच होत नसतं. याआधीही झाले नव्हते, त्यादिवशीही झाले नव्हते आणि यापुढे होणार नाही. आपल्या The Fox या कादंबरीत फ्रेडरिक फोरसिथ म्हणतात तसं ..Some things do not change ....Friends , Foes, Enemies , Traitors , Fools who talk too much .... मला मनापासून वाटतं की या यादीत शेअरबाजारही समाविष्ट करावा. Deciding what not to .... यातली सगळ्यात गंमतीशीर गोष्ट म्हणजे २९ ऑक्टोबर २०१८ रोजी मुम्बई शेअरबाजाराचा निर्देषांक एका दिवसात ७०८ अंशांनी वाढत असताना त्यादिवशी आयसीआयसीआय बँकेच्या शेअर्सच्या बाजारभावात सर्वात जास्त वाढ झाली. बँकेची सक्षम आर्थिक कामगिरी हे त्याचे कारण म्हणून सांगितले गेले. ही आर्थिक कामगिरी काय एका रात्रीत जन्माला आली होती का? चंदा कोचर – विडियोकॉन कर्ज प्रकरण चघळले जात होते तेंव्हा ही आर्थिक कामगिरी का लक्षात घेतली गेली नाही ?

आणि उलटेही ...शेअरबाजाराचे मन आणि मनातला शेअरबाजार हेच आणि इतकेच खरे. आणि म्हणूनच ... Deciding what not to ....

या शेअरबाजाराचे मन वाचायचा प्रयत्न करायचा असेल (आणि आपण फक्त प्रयत्नच करू शकतो) आणि त्याची सांगड आपल्या मनातल्या शेअरबाजाराशी घालायचीच असेल तर एक मोठी अडचण असते ...ती म्हणजे आपण आणि बाजार यांची मूळ प्रवृत्तीच वेगळी असते आणि आपण हे लक्षात घेत नाही. घेऊ शकत नाही. अनेकदा घेऊ इच्छित नाही.

फ्रेडरिक फोरसिथ त्यांच्या The Fox या पुस्तकात म्हणतात तसं ... Logical are always frightened of the insane.

मुद्दा फक्त इतकाच असतो की, आपण स्वतःला तर्कशुद्ध किंवा तर्कसंगत (Logical) समजत असतो आणि शेअरबाजाराला Insane.

कदाचित शेअरबाजाराला आपल्याविषयी असंच काहीतरी वाटत असेल!

दोघेही एकाचवेळी आपापल्या जागी बरोबर असतीलही आणि नसतीलही ...यातून जन्माला येऊ शकणारी एक गोष्ट म्हणजे आपण स्वतःला फसवणे. ही सगळ्यात मोठी चूक ठरते. फ्रेडरिक फोरसिथ त्यांच्या या पुस्तकात म्हणतात ... The worst variant of error is self - delusion एकंदरीत काय ....Deciding what not to....

हे बरोबर नाही असंच आपलं अंतर्मनही सांगत असतंच ! कारण फ्रेडरिक फोरसिथ त्यांच्या The Fox या पुस्तकात म्हणतात– अशा प्रसंगी वेळ, पैसा, प्रयत्न, घाम, मेहनत आणि अश्रू (Time, Money, Efforts, Sweat , Toil , Tears) हे सगळेच पैलू पणाला लागलेले असतात. बाजारी भांडवली – मूल्य (मार्केट कॅपिटलायझेशन) २००००० कोटी रुपयांनी कमी असे मथळे (हेडलाइन्स) वाचताना हे फार जाणवत राहाते. हे विसरायचं नाही हे तर नक्कीच ! पण त्यातून काय शिकायचे हेही तितकेच महत्त्वाचे ....कारण स्वतःवरचा विश्वासही महत्त्वाचा असतोच. फक्त आत्मविश्वास आणि फाजील विश्वास या दोन वेगळ्या गोष्टी असतात याकडे दुर्लक्ष करून चालत नाही. अर्थातच ही तारेवरची कसरत आहे . पण चढत्या आणि पडत्याही शेअरबाजारात संबंधित कंपनीची मूळ आर्थिक कामगिरी कशी आहे हे पाहात राहावेच लागते. कारण आज ना उद्या, कधी ना कधी तरी, शेअरबाजाराला या घटकांकडे यावेच लागते.

अगदी लागतेच.

विशेषतः जेंव्हा काही घोटाळ्यांची चर्चा – चौकशी

सुरू असते आणि त्याच्या छत्रछायेखाली शेअरबाजाराची वाटचाल सुरू असते तेंव्हा संबंधित कंपनीच्या शेअर्सचे बाजारभाव वाढत असले तरी, आणि पडत असले तरी, त्यात उलाढाल करत असताना तर हे जास्तच महत्त्वाचे आहे. कारण संबंधित घोटाळा कंपनीच्या मूळ कारभाराशी संबंधित किती आणि कंपनीच्या हिशोबाशी संबंधित किती हे ठरवणे सर्वसामान्य गुंतवणूकदारांना तसे कठीणच आहे . सत्यम कंपनीतील घोटाळा काही वर्षांपूर्वी गाजत असताना सत्यम कंपनी ज्या संगणकीय क्षेत्रात कार्यरत होती, त्या क्षेत्रातील ग्राहकांना त्या कंपनीच्या सेवेबद्दल फारशा तक्रारी नव्हत्या. रामलिन्गाम राजू साहेब त्या कंपनीच्या ताळेबंदाशी खेळत होते. नीरव मोदी – मेहुल चौक्षी – विजय मल्ल्या यांच्याबद्दल नेमके काय ? आयएलएफएस समूहातील मोजक्याच कंपन्या शेअरबाजारात नोंदणीकृत आहेत हे बरंच आहे असे म्हणायचे.

फक्त काय आहे ....असं काहीतरी सतत सुरूच असतं. फ्रेडरिक फोरसिथ त्यांच्या या पुस्तकात म्हणतात तसं ... Financial crimes are pandemic. म्हणजे इतकेच Deciding what not to ....

यातलं संतुलन हाही धोकादायक पण अत्यावश्यक घटक आहे असे म्हणताना याच पुस्तकातले फ्रेडरिक फोरसिथ यांचे Desire to believe is trimphuant . ...always the precursor of - successful confidence risk हे वाक्य उद्धृत करण्याचा मोह जरासुद्धा आवरत नाहीये हे मोकळेपणाने सांगितलेच पाहिजे .....Deciding what not to ...

He who pays the paper, calls the tune असं काय उगाचच म्हटलं जाते का ? मानवी संस्कृती इतकाच भ्रष्टाचार जुना आहे हा आपलाही अनुभव आहेच की ! (फ्रेडरिक फोरसिथही त्यांच्या या पुस्तकात तसं म्हणतात बरं का!). आपल्या देशाच्या माजी पंतप्रधान कै. माननीय इंदिरा गांधी ह्या, 'भ्रष्टाचार ही जागतिक वस्तुस्थिती आहे', असं म्हणायच्या तसेच हे आहे. आपण उचलून दुसऱ्याला काहीतरी देऊन त्याला अगदी आपल्या तालावर नाचायला नाही लावले तरी निदान काहीवेळा तरी आपल्या मनासारखे वागायला लावू शकलो तर ....

शेअरबाजाराचे मन आणि मनातला शेअरबाजार यांची अशी सांधेजोड करण्यात अडचण येऊ नये.

हे दरवेळी जमतंच असं नाही. खरं म्हणजे, बऱ्याचदा नाहीच. मग काय? फ्रेडरिक फोरसिथ म्हणतात तसं, Wounded pride, resentment at ego - affronting treatment, self - importance असले घटक आपल्यावर स्वार होतात. तसं वाटणे अयोग्य नाही; पण त्यानुसार निर्णय घेत वागण्यातून तर्कसंगती (लॉजिकल) कडून शहाणपणाला धरून नसलेल्या (Insane) कडे वाटचाल सुरू होते .... Deciding what not to ....

हे दरवेळी जमलंच पाहिजे असे नाही . पण सुरवात तर केलीच पाहिजे ना ! फ्रेडरिक फोरसिथ यांचे हे पुस्तक वाचत असताना एकसारखे एकच मनात येत होते की, गुप्तहेरी आणि गुंतवणूक या दोन्ही क्षेत्रांत असणारा कमालीचा साम्याचा मुद्दा म्हणजे दोन्ही क्षेत्रांत अखंड सावधानता आणि संयम या गुणांची आवश्यकता असते. या दोन्ही क्षेत्रांत काय होते आहे, कसे होते आहे आणि का होते आहे हे समजून घ्यावे लागते. त्याला सायबर क्षेत्राप्रमाणेच काळावेळाचे बंधन नसते. प्रसंगी आपण चुकू शकतो, आपला अंदाज चुकू शकतो, आपला पवित्रा चुकू शकतो, पण तरीही ना स्वतःवर रागावून चालत; ना परिस्थितीवर. कारण फ्रेडरिक फोरसिथ त्यांच्या या पुस्तकात म्हणतात तसं ... –nger clouds judgement, defeats logic , obscures clarity. मग चिडचिड होणं ओघानेच आलं. आपण थोडेच स्थितप्रज्ञ आहोत?(स्थितप्रज्ञ म्हटलं ना की पु. ल. देशपांडे यांनी

त्यांच्या 'तुझं आहे तुजपाशी' या नाटकात केलेली स्थितप्रज्ञ व्यक्तीची व्याख्याच आठवते.)

अशा प्रसंगी या पुस्तकातील एका प्रसंगात दिलेली काही वाक्ये आठवू लागतात. फ्रेडरिक फोरसिथ लिहितात ...One must observe modesty in triumph, stoicism in pain and grace under fire in defeat . आणि हे साध्य करण्यासाठी एकच करावे असेही फ्रेडरिक फोरसिथ त्याच पुस्तकातल्या त्याच प्रसंगात सांगतात .... Deceive the enemy. Outwit him. Outmanoeuvre; and not defeat .

या प्रसंगात ते पुढे जे सांगतात, ते तर फारच खरे आणि गंमतीचे आहे . ते सांगतात की, हे आपल्यासाठीच करायचे असते. शेअरबाजार नेहमीच आपल्यापेक्षा वरिष्ठ असतो. आणि आपण सांगितलेले वरिष्ठाला कळले नाही तरी जीव त्याचा नाही तर आपला आणि आपलाच जातो हे काय वेगळेपणाने स्पष्ट करायला हवे? (हे आपापल्या व्यावसायिक आयुष्यालाही ....) Deciding what not to decide .... यासाठी शेअरबाजारात अनेकदा फॉर्म्युला ट्रेडिंग, ट्रिगर्स, टेक्निकल, पोझिशनल वगैरे गोष्टींचा सल्ला दिला जातो. मी त्याच्या विरुद्धही नाही. पण संगणक हा काही सर्व गोष्टींवरचा रामबाण उपायही नाही. फ्रेडरिक फोरसिथ त्यांच्या या पुस्तकात एके ठिकाणी फार छान लिहून जातात ... Computers as we know can solve the problems; but they can also malfunction. इथे तर ही शक्यता आपण स्वतः, शेअरबाजार आणि संगणक या तिन्हिंबाबत ....

त्यामुळे हेच खरे की, गुंतवणूक क्षेत्रांत कोण किती शाश्वत असू शकेल हे जर फ्रेडरिक फोरसिथ यांच्या The Fox या कादंबरीचा आधार घेत सांगायचे झाले तर .... As sure as one can ever be in an uncertain world. मला या पुस्तकातले गुंतवणूकदार म्हणून सगळ्यात जास्त आवडलेले वाक्य सांगतो– ...One has his orders; one also had his ultimatum. फक्त इतकेच मनात येते की नेहमीच आपण बाजारात ऑर्डर देतो; बाजाराला ऑर्डर देता येईल अशी क्षमता ...

तोच प्रकार अल्टिमेटम बाबतही ....

मला नेहमीच वाटतं की संत तुलसीदास यांच्या काळात शेअरबाजार नसावा. निदान आपल्या देशात तरी नसावा. कारण ते त्यांच्या एका रचनेत म्हणतात....

ढोल, गवार, पशू, शूद्र, नारी
ये सब ताडन के आधिकारी.

मला फार वाटतं, खरं म्हणजे खात्री आहे की, त्यांच्या काळात शेअरबाजार असता तर संत तुलसीदास म्हणाले असते ... ढोल, गवार, पशू, शूद्र, बाजारी; ये सब ताडन के आधिकारी.

अर्थातच त्यांनी तसे म्हटले असते तरी बाजार आणि बाजारी यांच्यावर त्याचा किती परिणाम झाला असता हाही प्रश्न आहेच!

प्रश्नच आहे. कारण ... सरतेशेवटी ...

शेअरबाजाराचे मन आणि मनातला शेअरबाजार ....

**– चन्द्रशेखर टिळक**
सी –४०२. राज पार्क,
मढवी बंगल्याजवळ,
राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व )
पिन – ४२१२०१
भ्रमणध्वनी – ९८२०२९२३७६

•••

मूर्खाचे हृदय त्याच्या तोंडात असते, तर शहाण्याचे तोंड त्याच्या हृदयात असते! – बेंजामिन फ्रँकलिन

# इंटुकल्या - पिंटुकल्यांच्या देशात ...

*अनेक वादांत गुरफटून निश्चित ध्येयापासून विचलित झालेल्या भारतीय समाजातल्या बुद्धिवादी लोकांच्या निष्क्रीयतेवर परखड भाष्य करणारा लेख - संपादक*

एक आटपाट नगर होतं त्या काळाशी साम्य दाखवणारी इंटुकल्या – पिंटुकल्या देशाची गोष्ट आजसुद्धा तेवढीच ताजी आहे. काय आहे हा इंटुकल्या – पिंटुकल्यांचा देश? खरं तर, इंटुकले म्हणजे मानवाचा मेंदू याच अवयवाच्या जोरावर उद्योग करणारे तर पिंटुकले म्हणजे मेंदूचा वापर करणाऱ्यांना पिना मारून त्यांना खेळायला लावणारे आणि नंतर टुकल्या दाखवणारे सुद्धा! आता एखाद्या ठिकाणी लोक मेंदूचा खूपच जास्त वापर करू लागले तर ती आनंदाचीच गोष्ट; पण ह्या इंटुकल्या – पिंटुकल्यांच्या देशात सगळंच वेगळं. ह्या देशात इंटुकल्यांचा मान मोठा. त्यांना 'थिंक टँक', 'किंगमेकर' किंवा गेलाबाजार 'गेमचेंजर' इ. म्हणण्याची प्रथा आहे. तेव्हा या मानी (पक्षीः इंटुकले) आणि अभिमानी लोकांचा गोतावळा सांभाळावा लागतो तो पिंटुकल्यांना. तर हे पिंटुकले कोण? हे पिंटुकले म्हणजे ज्यांना सभा गाजवून विधिमंडळे, मंत्रालये किंवा किमानपक्षी महामंडळे तरी पदरात पाडून पवित्र करून घ्यावयाची आहेत असे. काय असतो या पिंटुकल्यांचा उद्योग? त्यांचा मुख्य उद्योग म्हणजे इंटुकल्यांच्या बौद्धिक पिकाच्या जोरावर सुगीच्या दिवसात स्वतःची धन करून घेणे हाच. मग हे इंटुकले काय काम करतात? तर हे इंटुकले त्यांची सगळी बुद्धी पणाला लावून वैचारिक आणि बौद्धिक कीस पाडत राहतात आणि आम्हीच कसे महत्त्वाचे याचे ढोल बडवत राहतात.

मग या साठमारीत चार-दोन इंटुकले पुरेसे असतील ना? मुळीच नाही. जेवढ्या प्रकारचं बौद्धिक पीक पिंटुकल्यांना लागतं तेवढ्या प्रकारची उत्पादनं काढायला अनेक प्रकारचे इंटुकले लागतात. मग त्यात काही अज्ञेयवादी असतात तर काही प्रत्यक्षवादी; काहींना अनुभववाद सुचतो तर काहींचा झेंडा हा कल्पनावादाचा असतो. अर्थात असल्या कालबाह्य इंटुकल्यांची सद्दी सध्या संपलीय आणि त्या जागा आता मार्क्सवादी, भांडवलवादी, डावे-उजवे-कडवे-अतिकडवे, मध्यममार्गी, समन्वयवादी असल्या नव्या इंटुकल्यांनी घेतल्याचे दिसतेय. बरं, या इंटुकल्यांचा नेमका ठावठिकाणा कसा सांगावा? काही जण दिल्लीच्या उच्चभ्रू व्यक्तिस्वातंत्र्यवादी (वादी-पुन्हा वाद) घराण्याचे वारस असतात, तर काही थेट ऑक्सफर्डादी विदेशी घराण्यांच्या पारंब्यांना लोंबकळणारे. त्यावर कडी म्हणून काही जण 'भूमिपुत्र स्पिरीट' ने जागलेले आणि बाकीच्यांची 'उपरे' म्हणून संभावना करणारे. आम्ही 'जागल्याची' भूमिका निभावतो आणि समाजाला आरसा दाखवतो असा या सगळ्यांचा दावा. आता या सगळ्यांची साधनसामुग्री तरी केवढी? अबब! कोणी टीव्ही चॅनेल वेल्हाळ, तर कोणी स्तंभ लेख आणि अग्रलेखाच्या लांबी-रुंदीत व्यस्त. कोणी पत्रके काढतोय तर कोणी पुस्तकांची चळत लावतोय. काही जण तर यापलीकडे जाऊन नाटक-सिनेमा-तमाशा आणि लोककलांच्या आश्रयाला जातात. काय तर म्हणजे त्यांचा संदेश थेट भिडतो लोकांना. केवढा हा व्याप!

आता या बौद्धिक पिकाच्या बेगमीवर ज्यांची मदार असते ते पिंटुकले फक्त या पिकांच्या मशागतीतच

नव्हे तर 'काढणी'त पण पुढे असतात. पिंटुकल्यांच्या दृष्टीने इंटुकल्यांची विद्या-सरस्वती ही यांच्या 'लक्ष्मीची' स्वागताची गुढी. 'लक्ष्मी' यायला हवी असेल तर विद्या-सरस्वतीचा वरदहस्त असायला हवा. मगच त्यातून बौद्धिक-वैचारिक पीक येणार. मग ते लोकांपर्यंत पोहोचवायचं आणि मग त्यातून स्वतःची पोळी भाजायची. पिटुकल्यांना सुद्धा मोह होतो स्वतःला डावे-उजवे किंवा 'वादी' म्हणवून घ्यायचा; पण पिंटुकल्यांचा वादाचा रंग तसा बेतानेच गडद-फिकट होतो. पडत्या फळाची आज्ञा घेत पिंटुकले कधी डाव्यांचे होतात कधी उजव्यांचे, कधीकधी कुणाचेच नाही. ते असतात खरेतर स्वार्थपरायणवादी. पिंटुकल्यांची भूमिका तशी तळ्यातमळ्यात. पण तरीही पिंटुकल्यांची मदार सगळी इंटुकल्यांच्या जोरावर.

आता या इंटुकल्या-पिंटुकल्यांच्या भाऊगर्दीत इंटुकले-पिंटुकले मिळून ते काही करतात ते कुणासाठी? कशासाठी? तर त्यांच्याकडचं एक बाणेदार उत्तर असतं ते म्हणजे - 'समाजासाठी'. म्हणजे यांची उठाठेव चाललेली असते ती समाजासाठी आणि त्यातल्या 'सामान्य किंवा गरीब माणूस' याच्यासाठी. कोण असतो हा सामान्य जीव? हा सामान्य माणूस म्हणजे जो समाजात असतो तो खरोखरच इतका का महत्त्वाचा की ज्यासाठी या इंटुकल्या-पिंटुकल्यांनी अहोरात्र झटावं? करतो काय हा सामान्य माणूस? तर हा सामान्य माणूस कधी असतो कोरडवाहू शेतीत राबणारा गरीब शेतकरी, तर कधी शेतमजूर, कधी खाणीत-जंगलात सरकारी किंवा खाजगी प्रकल्पावर रोजंदारीवर जगणारा श्रमिक, कधी रोजगारासाठी भटकत कुटुंबाच्या चिंतेपायी चपला झिजवणारा सुशिक्षित बेरोजगार किंवा भूक आणि उपासमारीने आयुष्याला कंटाळलेला आणि मृत्यूची वाट बघणारा BPL- दारिद्र्यरेषेखालचा करुण सजीव. याच सजीवासाठी इंटुकले-पिंटुकले उठाठेव करत असतात आणि त्याचा खरा कैवारी असल्याचा दावा करतात.

आमचा मार्क्सवाद आमचा भांडवलवाद यांना तारील अशा वल्गना करतात. आम्ही पुरोगामी, आम्ही सक्षम, आम्ही धोरणकर्ते आणि राज्यकर्ते अशा आरोळ्या ठोकून धुरळा उडवून देतात. निवडणुकीच्या मैदानात याच सामान्य जीवाचा लिलाव करतात आणि मैदान मारलं की याच सामान्य माणसाच्या नरड्याला नख लावतात - कधी खोट्या आर्थिक विकासाच्या नावाखाली प्रकल्पग्रस्त म्हणून, कधी राजकीय-धार्मिक जातीय साठमारीचा निष्पाप बळी म्हणून, तर कधी राजकीय पोळी भाजायला बळीचा बकरा म्हणून. याच सामान्य माणसाचा कैवार घ्यायला काहीही करायला तयार असणारे हे पिंटुकले सामान्य माणूस नावाच्या जीवाशी कधी पर्यावरण-जातीय अस्मिता - धार्मिक, भाषिक अभिनिवेश - सामाजिक अपरिहार्यता या कुठल्या तरी कारणावरून अमानुष खेळ खेळत राहतात आणि त्यांना मूक संमती देत राहतात. स्वतःच्याच आनंदात मशगूल असणारे, स्वतःच्या चोपड्या सांभाळणारे निबर कातडीचे इंटुकले. आम्ही घडल्या घटनांची कारणमीमांसा करतोय अशी लोणकढी थाप देऊन चिंतनाचा रतीब घालत वर्षानुवर्ष रवंथ करणारे 'चिंतनशील' इंटुकले म्हणजे साप गिळून सुस्त बसलेला जंगली अजगरच जणू! भयंकर वादावादी करून आम्ही बदल घडवू असा डिंडिम वाजवायचा, तोंडदेखले वाद करायचे आणि प्रत्यक्षात त्याचत्या ग्रांथिक सिद्धांतांचा दाखला देत समाजाचं होणारं नुकसान डोळ्यांदेखत बघायचं हे सामाजिक पाप नाही का? इंटुकल्या-पिंटुकल्यांच्या या देशाला या सगळ्याची चीड कधी येणार? का या देशातला सामान्य माणूस जेव्हा या सगळ्यांच्या छाताडावर बसून थयथयाट करेल तेव्हा यांना जाग येणार? वाद-प्रतिवादाच्या फैरी झाडल्या म्हणजे बदल-

(पृष्ठ क्र. २५ वर)

दांभिक माणूस हा घरात जंगलीपणाने वागतो आणि बाहेर 'साधू' म्हणून मिरवतो. - सिनेका

# आधुनिक स्त्रीच्या समस्या

*आधुनिक जगातही स्त्रिया जुन्या नविन समस्यांना आजही सामोरे जात आहे. या लेखात स्त्रियांच्या समस्यांचे विवेचन करण्यात आले आहे- संपादक*

'स्त्री' या एका शब्दातच पूर्ण विश्व सामावले आहे. इतिहासकाळातील स्त्रियांनी वेगवेगळ्या क्षेत्रांत आपले धैर्य दाखवले. युद्धासाठी लढाईला उतरणे, घरातील अन्यायाविरुद्ध लढा देणे, घरातल्या विरोधाला सामोरे जात शिक्षण घेणे अशा आणि आणखी बऱ्याच समस्यांना पूर्वीच्या काळातील स्त्रिया सामोऱ्या गेल्या. याशिवाय आपल्या महाराष्ट्रातल्या अनेक मातांनी आपल्या मुलांचे संगोपन उत्कृष्टरित्या केले. रामाची कौसल्या, कृष्णाची यशोदा, शिवबांची जिजाऊ या मातांनी त्यांच्या मुलांना दिलेले प्रोत्साहन वाखाणण्याजोगे आहे. या स्त्रियाच जर नसत्या तर आज इतिहास हा काहीतरी वेगळाच शिकायला मिळाला असता. स्त्रियांचा जन्म घेतला म्हणजे अनेक संकटांतून सामोरे जाण्याची शक्ती त्यांच्यामध्ये असतेच. स्त्रियांचे एक महत्त्वाचे रूप म्हणजे आई. आईसाठी कवी फ. मु. शिंदे यांच्या कवितेच्या ओळी अगदीच तंतोतंत जुळणाऱ्या आहेत.

आई म्हणजे - लेकराची माय असते,
वासरासाठी गाय असते,
लंगड्यासाठी पाय असते,
आणि दूधावरची साय असते.

पूर्वीच्या काळातील स्त्रियांसमोरही अनेक अडचणी होत्या. स्त्रियांवरील अन्याय, बलात्कार हे प्रकार तेव्हापासूनच चालत होते. स्त्रियांवर घरात मारहाण, मानसिक छळ, शिक्षण घेऊ न देणे, सतीप्रथा, बालविवाह, केशवपन अशा अनेक समस्या होत्या. पण या समस्यांवर मात करीत त्यांनी आपल्या जीवनाची वाट शोधली. त्या काळात महात्मा जोतीराव फुले यांनी मुलींसाठी प्रथम शाळा चालू केली व त्यांच्या सहधर्मचारिणीला म्हणजेच सावित्रीबाई फुले यांना शिक्षिका म्हणून ठेवले. हे पाहून समाजातल्या अनेक स्त्रिया प्रोत्साहित झाल्या व शिक्षण घेऊ लागल्या. घरातून परवानगी मिळू लागली. घरातील स्त्री शिकली की संपूर्ण घर शिकते हेच खरे! अशा प्रकारे स्त्रियांची हळूहळू प्रगती होत गेली.

आज आपण एकविसाव्या शतकात जगतो आहोत. जग आधुनिक झाले आहे. प्रसारमाध्यमांच्या वापरामुळे जग जवळ आले आहे. माणसाची प्रगती झपाट्याने वाढत आहे. आजच्या जगात स्त्रिया या पुरुषांच्या बरोबरीने चालतात अशी परिस्थिती आहे. हे वाक्य जितके खरे आहे, तितकेच बरोबरही वाटते का? पुरुषांना जसा समाजात मान दिला जातो, तेवढाच मान स्त्रियांनाही मिळतो का? काही वेळा माणसांचे वागणे इतके विचित्र असते की, सर्व प्राण्यांमध्ये बुद्धिमान असलेला हा प्राणी असा का वागतो? हा प्रश्न मनात येतो. काही वेळा त्याची बुद्धी भ्रष्ट होते का?

आधुनिक काळातील स्त्रिया फक्त 'चूल आणि मूल' एवढेच न करता स्वावलंबी होण्यासाठी घराबाहेर नोकरी करण्यासाठी पडतात. घराबाहेरील जग स्त्रियांकडे कोणत्या नजरेने पाहिल हे काही सांगता येत नाही. आजकाल रोजच वृत्तपत्रांमध्ये, बातम्यांमध्ये तसेच आपल्या आजूबाजूच्या परिसरात एकतरी बातमी स्त्रियांवरील अत्याचाराची, बलात्काराची, मानसिक

काहीजण हसून आपले देखणे दात दाखवितात, तर काही जण रडून आपली सहृदयता दाखविण्याचा प्रयत्न करतात! - जे. रॉक्स

छळाची आपल्याला वाचायला मिळते. स्त्रिया नोकरीच्या निमित्ताने लोकल्समधून, बसमधून प्रवास करतात. पण तो किती सुरक्षित असतो? 'स्त्रियांची असुरक्षितता' हा आजच्या जगासमोरचा यक्षप्रश्न आहे. रात्रीच्या वेळी उशिराने घरी परतणाऱ्या स्त्रियांच्या मनात कायमची भीती असते. तरुण मुलींना तर अशावेळी परतणे म्हणजे खूपच मोठे संकट. 'दिल्ली गँग रेप' प्रकरण हे याचेच एक उदाहरण. यामुळे संपूर्ण जनता संतप्त झाली होती. पण यावर काही ठोस पावले उचलली जातात का? अजूनही काही आरोपी मोकाट सुटलेले आहेत. स्त्रियांचे आरक्षण ३३% होते. ते आता ५०% झाले. पण काय फायदा? समाजात काही बदल झालेला आहे का? घराबाहेर अनोळखी व्यक्तींकडून असे प्रकार घडतात. पण घरातही स्त्रियांच्या स्वतःच्याच माणसांकडून अनुचित घटना घडतात आणि अनेक स्त्रिया आपला प्राण सोडतात. या जाचाला, छळाला कंटाळून आपण लोक त्या रावणाला दोष देतो, त्याचा राग करतो. त्याने सीतेचे अपहरण केले हे खरे, पण त्याने तिच्या अंगाला हातदेखील लावला नाही. आजकालच्या या मनुष्यरूपी राक्षसांनी रावणाचा तरी थोडा आदर्श घ्यावा. तुम्हाला कृष्ण होऊन स्त्रियांना आदर देता येत नसेल, मदत करता येत नसेल, तर फारफार रावणाचा तरी आदर्श डोळ्यांपुढे ठेवला तरी हे प्रकार घडण्याचे कमी होतील.

बाहेरच्या जगात स्त्री आजदेखील सुरक्षित नाहीच! स्त्रियांचा आजही वापर करून वस्तू म्हणून हवा तेव्हा उपभोग घेतला जातो. याचे एक उदाहरण म्हणून जाहिरात क्षेत्राचा उल्लेख मला करावासा वाटतो. जाहिरातींतून प्रसिद्धीसाठी त्यांचा मादक वावर वाढण्याने अनेक जाहिरातदार त्यांचा वापर करून घेतात. हा त्यांच्या कलेचा नसून त्यांच्या शरीराचा वापर आहे हे मात्र त्या मॉडेल विसरतात. हे खरंच निंदनीय आहे. स्त्रियांना प्रसिद्धी नक्कीच मिळावी, पण ती अशाप्रकारे नको.

पूर्वी जशी स्त्री उंबरठ्याच्या आतच सुरक्षित होती. तिच परिस्थिती पुन्हा उद्भवते की काय? असं आता वाटायला लागलंय. आधुनिकतेच्या नावाखाली स्त्रियांचे नको तितके 'फ्री' वागणे-बोलणे, फॅशन, सोशल मिडियाचा अतिवापर हेदेखील या सर्वाला तितकेच कारणीभूत ठरत आहे हे सुद्धा लक्षात घेतले पाहिजे.

बलात्कार, शारीरिक छळ, अत्याचार, हिंसा यांसारख्या घटना आपण टाळू शकतो का? याला निश्चितच 'हो' उत्तर आहे. आपल्यासमोर अनेक आदर्श स्त्रिया आहेत. किरण बेदींसारखं बेधडक व्यक्तिमत्त्व, कल्पना चावला यांच्यासारखी अंतराळात जाणारी पहिली महिला, इंदिरा गांधी, क्रीडा क्षेत्रात नाव कमावणारी पी.टी. उषा अशा अनेक क्षेत्रांत उंच भरारी मारलेल्या स्त्रियांनी स्वतःला सिद्ध करून दाखवलं आहे.

''या देवी सर्व भूतेषू शक्तीरूपेण संस्थिता!''

हे वचन प्रत्येक स्त्रीने आज सिद्ध करून दाखवले पाहिजे. कारण प्रत्येक स्त्रीकडे एक सुप्त शक्ती असते. जी कोणत्याही संकटावर मात करू शकेल.

अशा प्रकारे आधुनिक जगातही स्त्रिया जुन्या-नवीन समस्यांना आजही सामोरे जात आहेत. ''अबला नहीं सबला है तू'' हे आजच्या स्त्रियांनी लक्षात घेतले पाहिजे. स्त्री ही माणूस आहे. तिला माणूस म्हणून जगण्याचा पूर्ण हक्क आहे आणि तो हक्क तिला मिळालाच पाहिजे. समाजाने सुद्धा स्त्रीला प्रत्येक गोष्टीत साथ दिली पाहिजे. कारण जेव्हा स्त्री जन्माला येईल, तेव्हाच एक नवा समाज जन्म घेईल!

**– गौरी अंबाजी परब**
(द्वितीय वर्ष – बी.एम.एम.)
जोशी बेडेकर महाविद्यालय, ठाणे

•••

जो स्मितावर पोट भरतो त्याला दांभिक म्हणतात. – यंग

# मकरसंक्रांत

*सण आणि आरोग्य या सदरात मकरसंक्रांत व आरोग्य या विषयावर चर्चा करणारा डॉ. शैलजा व्यंकट धर्माधिकारी यांचा लेख - संपादक*

संक्रांत म्हणजे सम्यक् क्रांती. संक्रांत दर महिन्याला येते. जसे बारा महिने बारा राशी. सूर्य एका राशीत एक महिना असतो. सूर्य एका राशीतून दुसऱ्या राशीत जाणे यालाच संक्रमण असे म्हणतात. सूर्य कर्क राशीत आला की कर्क संक्रांत. सूर्य मकर राशीत आला की मकरसंक्रांत.

संक्रांतीच्या आदल्या दिवशी भोगी असते. या दिवशी तीळ लावलेली भाकरी, भरीत, दाण्याच्या उसळी खाण्याचा प्रघात आहे.

संक्रांतीच्या दिवसात थंडी वाढलेली असते. शरीरात रुक्षता निर्माण होते. बाजरी उष्ण असते आणि स्निग्ध असतात. म्हणून या सणाला उष्ण स्निग्ध आणि पौष्टिक आहाराची योजना केलेली आहे.

थंडीमुळे शरीरातील वात वाढलेला असतो. रुक्षतेमुळे त्वचा खरखरीत होते. केसात कोंडा होणे, केस गळणे, मलबद्धता होणे, सांधे दुखणे, अंग दुखणे ही लक्षणेही असतात. या सर्व तक्रारींवर तीळ हे उत्तम औषध आहे. तीळतेलाने शरीराला अभ्यंग केल्यास त्वचेची रुक्षता कमी होते. वेदना कमी होतात. शक्ती वाढते.

केस वाढण्यासाठी रोज तीळ चावून खावेत. तीळ तेलाने शिरोभ्यंग करावा. केश्य औषधाने सिद्ध तीळ तेल केसांना लावल्यास केस गळणे, पिकणे, कोंडा होणे या तक्रारी दूर होतात.

रोज तीळ चावून खाल्ल्याने दात व हिरड्या मजबूत होतात.

रात्री अंथरुणात लघ्वी करणाऱ्या मुलांसाठी तीळ हे उत्तम औषध आहे. रोज रात्री झोपताना १ चमचा तीळ चावून कोमट पाणी पिण्यास दिल्यास रात्री लघवी होत नाही.

अशा पद्धतीने तीळाने शरीरातील रुक्षता कमी होते. शारीरिक बल वाढते, मलप्रवृत्ती साफ होते आणि भूक चांगली लागते.

मकरसंक्रांतीच्या या सूर्याच्या संक्रमणाशी जीवनाचेही संक्रमण जोडलेले आहे. या काळात सूर्य उत्तरेकडे सरकत जातो म्हणून या काळाला उत्तरायण म्हणतात. आपणही सूर्याप्रमाणे संक्रमण विकसित व्हायचे असते. अंधारातून प्रकाशाकडे जाण्याचा संकल्प करायचा.

आपल्याजवळील गोष्टी एकमेकांना देऊन नाविन्याचे सुख वाटून घ्यायचे. पौष महिन्यात नव्या धान्याच्या राशी घरात येतात. गहू, ज्वारी, हरभरा, वटाणा, ऊस, तीळ, बोर, पेरू हे सर्व मातीच्या सुगड्यात भरून पाच घरी वाण द्यायचे. तीळाचा स्नेह आणि गुळाची गोडी आपल्यात मुरवून ते वाण द्यायचे. स्वार्थ न ठेवता एक तीळ सर्वांनी वाटून खायचा.

या उत्सवानिमित्त स्नेह्यांकडे, मित्र, नातेवाईकांकडे जायचे. तिळगुळाचे लाडू द्यायचे असतात. 'तिळगूळ घ्या गोड गोड बोला' म्हणजे झालं गेलं विसरून जायचे. नव्याने स्नेह जुळवावा, वाढवावा.

तिळाच्या लाडवात पैसे घालून देण्याची प्रथा आहे. ती गुप्तदानाचे महत्त्व सांगते. सत्कार्याचा बोभाटा

करावयाचा नसतो.

संक्रांत म्हणजे संग क्रांती. माणसाने या दिवशी संगमयुक्त होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर इ. विकारांच्या परिणामांपासून शक्य तेवढे दूर राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

संक्रांती म्हणजे संघक्रांती. कोणत्याही मोठ्या कामाला संघटनेची गरज असते. संघे शक्ती कलौ युगे। संघात विशिष्ट शक्ती असते. त्यामुळे कठीण कार्य सहज शक्य होते.

या दिवशी पतंग उडवयाची प्रथा आहे. त्यामागेही विशिष्ट कारण आहे. पतंग उडवण्यासाठी मोकळ्या मैदानात जावे लागते किंवा इमारतींच्या गच्चीत जावे लागते. संक्रांतीच्या दिवशी आकाशात लाल, पिवळे, हिरवे पतंग उडताना दिसतात. आपण पतंग उडवत त्याच्या निमित्ताने गच्चीत गेल्यावर सूर्याची कोवळी किरण अंगावर पडतात जी आपल्या त्वचेच्या आरोग्यासाठी पोषक आहेत.

ही पतंगाची हस्ती आणि मस्ती तोपर्यंत राहते जोपर्यंत त्याची दोरी सूत्रधाराच्या हातात असते. सूत्रधाराच्या हातातून सुटलेला पतंग वृक्षाच्या डहाळीवर, वीजेच्या तारावर फाटलेला व विकृत दशेत पडलेला दिसतो. भगवंताच्या हातातून सुटलेला मानव पतंगही थोड्याच दिवसात रंग उतरलेला, फिक्का व अस्वस्थ झालेला पाहायला मिळतो.

या सणाच्या निमित्ताने सूर्याचे प्रकाश, तिळाचा स्नेह गुळाची गोडी व पतंगाच्या त्याच्या सूत्रधारावरचा विश्वास आपल्या जीवनात योग्य संक्रमण झाले असे म्हणता येईल.

**– डॉ. शैलजा व्यंकट धर्माधिकारी**

•••

(पृष्ठ क्र. १५ वरून – **कलम ३५ (अ) चा नेमका गोंधळ काय?**)

काही अध्यादेश पारित केले आहेत त्यांचे पुनर्परीक्षण करण्यासाठी एक उच्च स्तरीय घटनात्मक समिती निर्माण करावी, अशी ती सूचना होती. या समितीकडून पुनर्विचार करणे गरजेचे आहे. भारताच्या राज्यघटनेत विरोधाभास निर्माण करणाऱ्या गोष्टी काढून टाकल्या पाहिजेत.

आता सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण गेलेले आहे. त्यावर लवकरच निर्णय होईल. मात्र घटनासमिती नेमून या सर्व जुन्या अध्यादेशांचे पुनर्परीक्षण करणे आवश्यक बनले आहे.

**– डॉ. शैलेंद्र देवळाणकर**

---

(पृष्ठ क्र. २१ वरून – **इंटुकल्या – पिंटुकल्यांच्या देशात**)

विकास होतो का? वेगवेगळ्या पलटणीतले पिंटुकले गादीवर आले, खांदेपालट झाला तरच देश प्रगती करतो का? केवळ Argumentative आणि Intellectually bright असणं म्हणजेच सगळं का? सामान्य माणसाच्या हताश आणि करुण अपेक्षांचं काय? कुटुंबासाठी चुलीपुढे आणि बाहेर सुद्धा कष्ट करून बाळंतपणात मरणाऱ्या माउलीचं काय? किमान पोषणही मिळत नाही म्हणून अवघ्या काही दिवसांत जिथून आले तिथेच परत जाणाऱ्या कोवळ्या बालकांचं काय? बालमृत्यू प्रमाण कमी करण्याचा आमचा प्रयत्न आहे असं इंटुकल्यांचं आणि पिंटुकल्यांचं आर्ग्युमेंट अजून किती दिवस खेळवणार आपल्याला? वादांच्या भोवऱ्यात अडकलेला हा इंटुकल्या–पिंटुकल्यांचा देश कधी या गर्तेतून बाहेर पडून सर्वोदयाचा सूर्य पाहणार?

**– अपर्णा कुलकर्णी**
सेंट झेवियर्स महाविद्यालय, मुंबई
भ्रमणध्वनी : ७७६८०२७६५८

---

फक्त शहाण्या लोकांच्याजवळ विचार असतात; पण जगातील बहुसंख्य लोकांना मात्र विचारांनी पछाडलेले असते. – कॉलरिज

# श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे जन्मस्थान - डुबेरे

*श्रीमंत थोरले बाजीरावांचा जन्म डुबेरे या गावी झाला. या जन्मगावाची ओळख या लेखात करून देण्यात आली आहे - संपादक*

**''महाराष्ट्र भूमी बहुगुणी। शोभते खणी।**
**किती नरमणी। जन्मले हिच्या कुसव्यात।''**

असे एका शाहीराने म्हटलं आहे ते अगदी खरेच आहे. महाराष्ट्र ही नररत्नांची खाण आहे. त्यातील अनेक पराक्रमी युगपुरुषांची नोंद इतिहासाने घेतली आहे, त्यात अग्रपुजेचा मान अर्थातच हिंदवी स्वराज्य संस्थापक शिवछपतींचा. त्यांच्या खालोखाल आपल्या अजोड पराक्रमाने हिंदवी स्वराज्याचा विस्तार करणाऱ्या व भगवा झेंडा उत्तर हिंदुस्थानात नाचविणाऱ्या तेजस्वी, रणधुरंधर, महापराक्रमी, अपराजीत योद्धा श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांचा.

या असामान्य, पराक्रमी पेशव्याचे जन्मगाव असलेले डुबेरे ता. सिन्नर हे अद्यापही दुर्लक्षीत व उपेक्षीत आहे. या गावाची सर्वांना ओळख व्हावी यासाठी हा पंक्तीप्रपंच...

डुबेरे येथे ज्या वास्तूत (बर्वेवाडा) श्रीमंत बाजीरावांचा जन्म झाला त्या बर्वेवाड्याचा व बर्वे घराण्याचा इतिहासही मोठा रंजक आहे. बाजीरावांच्या मातोश्री राधाबाई या बर्वे घराण्यातील. कोकणातील गणपतीपुळ्याजवळचे नेवरे हे बर्व्यांचे मुळगाव. येथील दादाजी बर्वे यांना मल्हार व राधाबाई ही दोन अपत्ये. बाळाजी विश्वनाथ भट हे कोकणातील श्रीवर्धनचे. बाळाजींचे वडील छ. शिवरायांच्या चाकरीत होते. राधाबाई बर्वे व बाळाजी भट यांचा विवाह कोकणातच झाला होता. जंजिऱ्याच्या सिद्दीचा उपद्रव व कौटुंबिक आर्थिक अडचणींमुळे मल्हार दादो व बाळाजी विश्वनाथ कामधंद्याच्या निमित्ताने देशावर आले व छ. राजारामाकडे नोकरी पत्करली. छ. राजारामाच्या पडत्या काळात मल्हाररावांनी स्वामीनिष्ठा ठेवून जी अमोल कामगिरी केली त्याची परतफेड म्हणून. छ. राजारामाकडून त्यांना गंगथडी प्रांतात १४ प्रांतांची चौथाई मिळाली. ही गावे म्हणजे डुबेर, पांढुर्ली, पिंपळस व कोठूरे. आज या चारही ठिकाणी मल्हार दादो बर्व्यांचे वंशज रहात आहेत. बाळाजी विश्वनाथ भट प्रथम छ. राजाराम व नंतर छ. शाहूमहाराजांच्या सेवेत होते व स्वकर्तृत्वावर पेशवे पदापर्यंत पोहोचले. राधाबाई व बाळाजी यांचे प्रथम संतान म्हणजे थोरले बाजीराव. हिंदूशास्त्र रुढी, परंपरेप्रमाणे स्त्रीचे पहिले बाळंतपण माहेरी व्हावे हा प्रघात आहे. बाजीरावाचा जन्म पावसाळ्यातला (८ ऑगस्ट). पावसाळ्यात गंभीरशीने सासवडहून कोकणात जाणे जिकरीचे. तसेच सिद्दी उपद्रवामुळे असुरक्षितता म्हणून त्यामानाने जवळचे, सुरक्षित ठिकाण म्हणून भावाचे गाव डुबेरेची बाळंतपणासाठी निवड झाली असावी व बाजीरावाचा जन्म मामाच्या गावी (घरी) बर्वेवाड्यात झाला असावा असे अनेक जाणकारांचे मत आहे. कारण या युगपुरुषाच्या जन्मस्थळाविषयी अद्याप इतिहासाला प्रत्यक्ष पुरावा सापडलेला नाही व पेशव्यांचा जन्म डुबेरे येथेच झाल्याचे पिढ्यानपिढ्यापासून डुबेरकर ठामपणे सांगतात.

बर्वे घराण्याचे पूर्वज मल्हार दादाजी बर्वे यांनी वसवलेले डुबेरे हे गाव सिन्नरच्या दक्षिणेला ८ किमी अंतरावर आहे. एका बाजूला औंढा पट्ट्याची रांग व दुसऱ्या बाजूला डुबेरगड अशी भौगोलिक तटबंदी आहे. गावाला निसर्गाने मुक्तहस्ते सौंदर्य बहाल केले आहे. अजुनही गावाभोवती दाट वनराई आहे. या गावाच्या

नावाविषयी लोक एक मजेदार आख्यायिका सांगतात की दाट झाडीत डुबलेलं... डुबलेलं म्हणून डुबेरे असे नाव पडले. गावाला चहुबाजूंनी भक्कम तटबंदी होती. आजही त्याचे अवशेष दिसतात. गावाला उत्तर-दक्षिण अशा दोन वेशी आहेत. पेशव्यांचे जन्मस्थान असलेला बर्वेवाडा गावाच्या मध्यभागी आहे. गावाची रचना उत्तम ग्रामआराखड्यानुसार असून रस्ते व गल्ल्या एकमेकांना समांतर व काटकोनात छेदणारे आहे. गावात पुरातन दुमजली घरे आहेत. वाडा भक्कम, भुईकोट किल्यासारखा असून सभोवताली तटबंदी व बुरुज आहे. साधारण दोन एकर जागेत १६९५ च्या आसपास हा वाडा बांधला असावा. वाड्याला पूर्व व पष्चिम असे दोन भक्कम दरवाजे आहेत. पश्चिम दरवाज्यावर नगरखाना, रखवालदाराची देवडी, पाण्याचा आड, मोठी पागा, खिल्लारांसाठी गोठे आहेत. वाड्याला तीन चौक, भरपूर खोल्या, परिसरात लक्ष्मीनारायण, सटुबाई मंदिरे आहेत. वाड्याचे बांधकाम चिरेबंदी असून सागवानी लाकडांचा इमारतीचा सांगाडा आहे. लाकडांवरील नक्षीकाम अप्रतिम आहे. वाड्यात कचेरी, माजघर, देवघर, न्हाणीघर, स्वयंपाकघर, सोपा, बाळंतिणीची खोली, बळदं, देव्हारे, सज्जा, आड तसेच पूर्वज्यांच्या पराक्रमाची साक्ष देणाऱ्या ढाल, चिलखत, तलवार, भाला, ठासणीची बंदूक, चवऱ्या इ. वस्तू आहेत. पेशव्यांचे जन्मस्थान असलेली खोली, छपरी पलंग, न्हाणी सुस्थितीत आहेत. उन्हाळ्यात थंड व हिवाळ्यात उबदार असणाऱ्या नैसर्गिक वातानुकूलीत खोलीचे बांधकाम उत्तम वास्तूशास्त्राचा उत्कृष्ट नमुना आहे. वाड्याच्या भिंती ५-६ फूट रुंदीच्या असून भिंतीमधील जिने, दरवाजे, कोनाडे सिमेट्रीकल आहेत. वाड्याच्या बुरुजावर चढल्यावर गावाचा पूर्ण परिसर दिसतो. डुबेर गावाभोवती गवताची कुरणे असल्यामुळे पेशव्यांच्या फौजेला लागणारा चारा व तोफा, वाहतुकीसाठी लागणारी खिल्लारे पुरविण्याचे काम बर्व्यांकडे होते असे कागदपत्रांच्या अभ्यासावरून कळते. आज या वास्तूला ३२०-३२५ वर्षे झाली आहेत. हा बर्वेवाडा गावचे वैभव आहे. छ. शिवराय या मार्गानेच पट्टा किल्ल्यावर गेल्याचे सांगतात.

आज या गावात श्रीमंत बाजीरावाच्या नावाने स्थापन झालेली पतसंस्था बाजीरावाप्रमाणे यशस्वी घोडदौड करत रौप्यमहोत्सव साजरा करत आहे. पुण्यात शनिवारवाडा व बाजीराव रस्ता यापलीकडे काहीही ओळख नसलेल्या या असामान्य नेतृत्वाचा भारतातील दुसरा पूर्णाकृती पुतळा पतसंस्थेच्या आवारात दिमाखात उभा आहे.

आतापर्यंत या ठिकाणाला इतिहासकार कै. सेतु माधवराव पगडी, म. श्री. दीक्षित, ना. स. इनामदार, रणजीत देसाई, सुहास जोशी, सुरेश जोशी, कै. मिनाताई ठाकरे, साबीरभाई शेख, पेशव्यांचे वंशज कृष्णराव, उदयसिंह पेशवा व अनेक मान्यवर व इतिहासप्रेमींनी भेट दिली आहे.

पर्यटनाच्या दृष्टीने या स्थळाला भेट द्यायची असल्यास सिन्नरचे गोंदेश्वर मंदिर, गारगोटी संग्रहालय, डुबेरे येथील पेशवे जन्मस्थान बर्वेवाडा, अद्‌भूत भोपळ्याचे झाड, प्राक्तन लिहिणारी सटुबाई मंदिर, जवळच असलेला पट्टा किल्ला (विश्रामगड), टाहाकरी येथील जगदंबा मंदिर व केळी, सांगवी, खिरवीरे, एकदरा, टांकेद, सावरगाव येथील हिरवाकंच निसर्ग, झरे, धबधबे अशी छोटेखानी वर्षासहल कुटुंबीय, मित्रमंडळींसमवेत सहज जमवून होवू शकते. (सिन्नर ते सिन्नर हे अंतर १००-१२५ किमी) एकदा तरी या प्रेरणादाई स्थळाला अवश्य भेट द्या.

**- चंद्रशेखर बर्वे**

विज्ञान विभाग प्रमुख,
गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला,
भगवंतराव राजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सिन्नर, जि. नाशिक

•••

# चंपाषष्ठी

*चंपाषष्ठी तसेच अन्य सणांचे महत्त्व विशद करणारा आयुर्वेदतज्ज्ञ डॉ. शैलजा व्यंकट धर्माधिकारी यांचा लेख - संपादक*

डिसेंबर महिन्यात येणारे सण म्हणजे चंपाषष्ठी, गीताजयंती, दत्तजयंती आणि धनुर्मास.

पुरातन काली मणी आणि मल्ल या नावाचे दोन दैत्य होते. त्यांनी जनतेला त्रास द्यायला सुरुवात केली. तेव्हा शंकरानी मार्तंड-भैरवाचा अवतार घेऊन मणिचूल पर्वतावर मोठे युद्ध झाले. या युद्धात मणिदैत्य शरण आला आणि मल्ल दैत्य ठार झाला. म्हणून शंकराच्या या अवताराला 'मल्हारी' असे नाव मिळाले.

मार्गशीर्ष प्रतिपदा ते षष्ठी या सहा दिवसांचे युद्ध झाल्यामुळे सहा दिवस खंडोबाचे नवरात्र असते. पाच दिवस उपास करून सहाव्या दिवशी सोडतात. या दिवसात सतत देवासमोर नंदादीप ठेवतात. मल्हारी महात्म्य या ग्रंथाचे वाचन करण्यात येते. तळीचे पूजन करतात.

तळीतील भंडारा म्हणजे हळदीचे चूर्ण देवाला अर्पण करतात. 'येळकोट येळकोट जय मल्हार' असा जयघोष करून तळी उचलून खाली ठेवतात. असे तीन वेळा करतात. नंतर नारळ फोडून त्या पाण्याने देवाला मार्ज्यन करून खोबऱ्याचा नैवेद्य दाखवतात.

वांग्याचं भरीत आणि बाजरीचा रोडगा यांचा नैवेद्य दाखवतात.

नंदादीप हा स्वतः जळून जगाला प्रकाश देण्याची प्रेरणा निर्माण करतो. माणसाने प्रभू कार्यासाठी म्हणजे रंजल्या-गांजल्यांसाठी अखंड जळत राहिले पाहिजे अशी सूचना देतो. आपल्या घरात तेजाचे वर्तुळ निर्माण करतो.

त्यानंतर येते गीता जयंती ही मार्गशीर्ष शुद्ध एकादशीला असते.

कौरव पांडवांचे युद्ध सुरू होणार होते तो दिवस मार्गशीर्ष शुद्ध एकादशीचा. अर्जुन युद्धभूमीमध्ये आला, युद्धासाठी उभा राहिला तेव्हा तेथे त्याने त्याचे भाऊबंद, आजोबा, गुरू यांना पाहिले आणि हातातील शस्त्र खाली ठेवले आणि मी या स्वजनांशी युद्ध करणार नाही असे म्हणाला. तो हताश झाला तेव्हा भगवान श्रीकृष्णांनी त्याला जो उपदेश केला तो म्हणजे भगवद् गीता. श्रीकृष्ण अर्जुनाचा संवाद महर्षी व्यासांनी अठरा अध्यायांत वर्णन केला आहे. एखाद्या ग्रंथाचा जन्मदिवस साजरा करणे ही सर्व जगात गीतेचीच विशेषता असावी.

जीवन एक संघर्ष आहे. जीवन हे रडण्यासाठी नाही किंवा पळून जाण्यासाठी नाही; तर हसण्यासाठी आहे. ती मानवाला जीवनात प्रत्येक क्षणी येणाऱ्या लहान मोठ्या संकटात हिंमतीने उभे राहण्याची शक्ती देते. गीता विश्वधर्म ग्रंथ आहे. गीता कर्मयोग, ज्ञानयोग आणि भक्तियोगही सांगते.

निराशेच्या अंधारात चाचपडणाऱ्या माणसाला गीता आशेचा प्रकाश देते. मनुष्य गुलाबामध्ये काटे पाहतो. गीता त्याला काट्यांमध्ये गुलाब पाहायला शिकवते.

त्याग, बलिदान किंवा समर्पणाची भावना मनुष्याला खरा संन्यासी बनवते. काम्य कर्मांना प्रभूचरणी अर्पण करणे म्हणजे संन्यास. विद्यार्थ्याला गीता सांगते, 'तुला जर विद्या प्राप्त करावयाची असेल तर तुझ्याजवळ नम्रता,

आळशीपणा हा आत्महत्येचाच एक प्रकार. - लॉर्ड चेस्टरफिड

जिज्ञासा आणि सेवा या तीन गोष्टी असल्याच पाहिजेत.'

ज्ञानाचा उपदेश करणारा ज्ञानी तत्त्वदर्शी असला पाहिजे. कार्यकर्त्याला गीता सांगते, 'योगत् कर्मसु कुशलम्।' कर्मात कुशलता याचे नावच 'कर्मयोग'.

इच्छा आणि ध्येय यांच्यामधील अंतर पार करण्यासाठी करावा लागणारा प्रयत्न म्हणजेच 'साधना' होय. परिश्रमाशिवाय मिळणाऱ्या फळात गोडी नाही. ज्ञानी लोकांना गीता सांगते की, वादविवाद न करता संवाद करा.

कर्म योग्याला सांगते, 'कर्म कर, फळाची चिंता करू नकोस. मन लावून काम केले तर त्याचे चांगलेच फळ मिळेल.'

भक्ताला सांगते, 'भक्ताचा कधीच नाश होत नाही. भगवंताने भक्ताला आश्वासन दिले आहे. मी भक्ताचा योगक्षेम चालवतो. त्याला न मिळालेली वस्तू मी प्राप्त करून देतो आणि मिळवलेला वस्तूचं रक्षण करतो.'

माणसाने प्रतिकारक्षम व विकसनशील बनले पाहिजे. मनाची एकाग्रता वाढविली पाहिजे ही शिकवण गीता देते.

अशी ही गीता फक्त ग्रंथ नसून आपली आई आहे. गीतेचा हा संदेश सर्व मानवजातीसाठी आहे. या दिवशी सर्वांनी गीता आवर्जून वाचावी. गीता-जयंतीचा उत्सव सर्वत्र मोठ्या प्रमाणात घेण्यात आला तर गीतेचा विचार सर्वांपर्यंत पोहचेल आणि मानवी जीवनाचे कल्याण होण्यास मदत होईल आणि आपल्या मानसिक आणि आत्मिक विकासासाठी गीता आपल्याला मदत करील.

दत्तजयंती - मार्गशीर्ष पौर्णिमेच्या सायंकाळी दत्ताचा जन्म झाला. अत्री आणि अनुसयेच्या पोटी त्यांनी जन्म घेतला. पुराणात अशी कथा आहे. ब्रह्म, विष्णू आणि महेश महासती अनुसूयेच्या सतीत्त्वाची कसोटी पहायला अत्री ऋषींच्या आश्रमात आले. त्यांनी अनुसूयेला विवस्त्र होऊन भिक्षा वाढायला सांगितले. तेव्हा अनुसूयेने स्वतःचे तप आणि सतित्वाचा प्रभाव ह्यांच्या बळावर तीनही देवांना बालक बनवले आणि त्या अडचणींतून मार्ग काढला. देवपत्न्यांच्या विनवणीवरून अनुसूयेने त्यांचे पती त्यांना मूळ स्वरूपात परत केले. जाता जाता देवांनी तिला आशीर्वाद दिला की, तू आम्हांला बालस्वरूप दिलेस, आमची आई बनलीस; आता आम्ही तिघेही संयुक्तरित्या तुझ्या कुशीत जन्म घेऊ. देवांच्या या आशीर्वादाने त्यांच्या संयुक्त अंश रूपात जन्मलेले बालक म्हणजे दत्त. अत्रिचा पुत्र म्हणून आत्रेय. दोन्ही मिळून दत्तात्रेय झाले.

ब्रह्म, विष्णू आणि महेश. उत्पत्ती, स्थिती आणि लय.

दत्तात्रेयाच्या हातात कमण्डलू, माळा, शंख, चक्र, त्रिशूळ आणि डमरू ही सहा प्रतीके आहेत.

ब्रह्मा हा निर्मितीचा देव आहे. त्याच्या हातात कमंडलू आणि माळ आहे. कमंडलूमध्ये पाणी असते. पाणी म्हणजे जीवन. कोणतीही निर्मिती ही प्राणवान असली पाहिजे. मग ती मानव असो शिल्प, चित्र, नृत्य, संगीत, साहित्य. त्यात भक्ती असेल तर ती प्राणवान होते. माळ ही भक्तीचे प्रतीक आहे.

विष्णू ही स्थिती पोषण करणारी देवता आहे. त्याच्या हातात शंख आणि चक्र आहे. शेख हा ध्वनीप्रेरक आहे तर चक्र हे गतीसूचक आहे.

कार्यकर्त्याने शंखाप्रमाणे तेजस्वी विचारांचा उद्घोष करून अन्य कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवला पाहिजे. कार्यप्रमुखाला सर्व कार्यक्षेत्रात चक्राप्रमाणे फिरता आले पाहिजे. शंकर ही लयाची म्हणजे संहाराची देवता

आळशी इसम म्हणजे दोन्हीही काटे नसलेले घड्याळ! - काऊपर

आहे. त्याच्या हातात त्रिशूळ आणि डमरू आहे. त्रिशूळ हे संहाराचे प्रतीक आहे तर डमरू हे संगीताचे प्रतीक आहे. मृत्यू ही काही भयंकर घटना नाही, तर मृत्यू म्हणजे जीवाचे शीवाला भेटणे. म्हणून भगवान शंकर स्मशानात राहतात.

जुने जाणे व नवे निर्माण होणे हीच संसारात असलेली प्रवाह नित्यता आहे. अशा या दत्तात्रेयांनी २४ गुरू केले. जगाकडून काय शिकता येईल याचे प्रतिपादन केले. आपण इतरांच्या गुणांची पूजा करून जगाकडून अनेक चांगल्या गोष्टी घ्याव्यात आणि हीच खरी दत्ताची पूजा होय.

पृथ्वी – सहनशीलता.

पिंगला – परमात्मा ध्यानात सुख आहे.

कबूतर – कोणावरही अधिक प्रेम आपला नाश करते.

सूर्य – सूर्य जसा वेगवेगळ्या रूपात दिसतो तशीच आत्म्याची रूपे वेगवेगळी आहेत.

वायू – कोणत्याही लोकात राहिले तरी स्वतःचा चांगुलपणा सोडू नये.

हरीण – सतत मौजमस्तीत राहिल्यामुळे कधीकधी जीवन धोक्यात येते.

समुद्र – जीवनातील चढ–उतारात गतीशील राहिले पाहिजे.

पतंगा – मोहात पडून स्वतःचा नाश करवून घेऊ नये.

हत्ती – संन्यासी आणि तपस्वी पुरुषांनी स्त्रीविषयी आसक्ती बाळगू नये.

आकाश – कुठल्याही देश, काल, परिस्थितीशी एकरूप होऊ नये.

जल – सतत पवित्र राहिले पाहिजे.

मधमाशी – आवश्यकतेपेक्षा जास्त संग्रह करू नये.

मासा – स्वार्थ आणि लोभांमुळे आपल्या प्राणांचा नाश होतो.

कुरनपक्षी – वस्तूंचा संग्रह न करता त्या सोडून द्याव्यात.

बालक – चिंतामुक्त, प्रसन्न राहावे.

आग – कशी परिस्थिती असेल त्याप्रमाणे वागावे.

चंद्र – शीतलता, चमक यात बदल होत नाही.

कुमारी कन्या – एकटे राहून वैराग्याने मनाला नियंत्रित करावे.

तीर – एकाग्रता.

साप – एकटे जीवन जगावे. एकाच जागी थांबू नये.

कोळी – जाळं निर्माण करून त्यात न गुंतता बाहेर पडतो.

भुंगा – जिथून जे चांगले मिळेल ते ग्रहण करावे.

अजगर – संतुष्ट राहावे. जे मिळेल त्यात सुख मानावे.

या गोष्टी आपण आपल्या जीवनात आत्मसात केल्या तर आपले शारीरिक, मानसिक, आत्मिक, इंद्रियांचे आरोग्य चांगले राहील आणि आपणही आपल्या जन्मात एखादे महान कार्य करू शकतो.

धनुर्मास – मार्गशीर्ष महिन्यात सूर्य धनुराशीत प्रवेश करतो. या दिवसापासून मकरसंक्रातीपर्यंत तांदूळ आणि मुगाची डाळ यांची खिचडी तयार करावी. तीळ लावलेली बाजरीची भाकरी आणि वांग्याची भाजी आणि मिरचीची चटणी करावी. त्याचा सूर्याला नैवेद्य दाखवावा आणि भोजन करावे.

मार्गशीर्ष महिन्यात हवेतील गारवा वाढलेला असतो.

(पृष्ठ क्र.३९ वर)

# परिसर वार्ता

– संकलित

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

दिवाळीच्या सुट्टीनंतर २६ नोव्हेंबर रोजी शाळेचे दुसरे सत्र सुरू झाले.

दुसरे सत्र हे अनेक उपक्रमांनी परिपूर्ण असते. १८ डिसेंबर रोजी माध्यमिक विभागाचे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून विविध नृत्य आणि नाटुकली यांची तयारी करून घेतली. योगासने, दशावतार मलाला युसूफजई इ. विविध कार्यक्रमांद्वारे मुलांनी प्रेक्षकांचे व इतर विद्यार्थ्यांचे मनोरंजनच नाही तर उद्बोधनही केले. आपला सांस्कृतिक वारसा जपणारे हे कार्यक्रम पाहून आणि कलाकारांचा उत्साह पाहून पालकवृन्द खूष झाला.

दि. २१ डिसेंबर रोजी विद्यार्थ्यांसाठी अल्पोपहाराचे आयोजन केले होते.

७ व ८ जानेवारी रोजी मावळी मंडळ येथील क्रीडांगणावर वार्षिक क्रीडादिन आयोजित करण्यात आला होता.

९ जानेवारी रोजी शाळेच्या पटांगणावर 'आनंद बाजार' आयोजित करण्यात आला.

१६ जानेवारी ते १९ जानेवारी दरम्यान शाळेचे ९ स्काऊटस् हे शाळेचे शिक्षक श्री. केशव चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यपुरस्कार स्पर्धेसाठी भोर-पुणे येथे सहभागी झाले.

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

**'नवरंग' महोत्सवाचे शानदार उद्घाटन !**

विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी – बेडेकर कला वाणिज्य महाविद्यालयात 'नवरंग' महोत्सवाचे प्राचार्या डॉ. सौ. सुचित्रा नाईक यांच्या हस्ते शानदार उद्घाटन झाले.



यावेळी उपप्राचार्या आणि नवरंग प्रमुख प्रा. सौ. मोनिका देशपांडे, उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे, ग्रंथालयप्रमुख प्रा. नारायण बारसे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या सौ. संगीता दीक्षित, पर्यवेक्षक त्रिवेणीप्रसाद शर्मा, समन्वयक डॉ. मृण्मयी थत्ते, समन्वयक डॉ. नीलम शेख तसेच विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग उपस्थित होते.

**राष्ट्रीय सेवा योजना निवासी शिबिर**



जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना NSS चे निवासी शिबिर २० डिसेंबर ते २६ डिसेंबर

---

दरम्यान ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथील टाकी पठार येथे पार पडले. येथे शिबिर घेण्याचे दुसरे वर्ष होते. एकूण ७४ विद्यार्थी आणि ६ शिक्षकांनी यात सहभाग घेतला.

या शिबिरांतर्गत विविध सामाजिक, पर्यावरणीय कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

**प्रमुख वक्ते आणि विषय**

१. प्रो. प्रियंवदा टोकेकर - गांधीजींची पंच तत्त्वे

२. प्रो. मीनल सोहनी - २१ व्या शतकात गांधीजींच्या 'अंत्योदय'ची संकल्पना.

३. श्री. महेश दूधभाटे - योग जीवनशैली

४. श्री भरत गोडांबे - टाकी पठार येथील जैविक विविधता आणि संवर्धन.

५. माजी पोलिस उपअधीक्षक (DYSP) सिंधुदुर्ग, श्री दयानंद गवस - सरकारी सेवेतील रोजगार संधी.

६. सौ. पवित्रा सावंत - उड्डाण-Motivational वक्त्या

७. श्री. पुरुषोत्तम अवटे आणि श्री. अमित पवार- मैदानी खेळांचे प्रशिक्षण(राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू आणि माजी विद्यार्थी)

शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी रोज संध्याकाळी ५ ते ७.३० या वेळेत खेळ, वादविवाद, पथनाट्य या सारखे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

लोकगीत स्पर्धा- या व्यतिरिक्त गावातील स्थानिक स्त्रियांसाठी विशेष लोकगीत स्पर्धा आयोजित करण्यात आली होती, ज्यासाठी ठाणे जनता सहकारी बँक प्रायोजक होती. एकूण ५६ स्त्रियांनी स्थानिक लोकगीते आणि नृत्ये सादर केली. विजेत्यांना साड्या आणि सहभागी स्त्रियांना डबे वाटप करण्यात आले.

स्वछता अभियान- टाकी पठारावरील सांडवी वाडी, मधली वाडी आणि टाकीची वाडी येथे स्वच्छता अभियान देखील करण्यात आले. शाळेच्या आवारातही स्वछता अभियान करण्यात आले.

शासकीय आश्रम शाळा टाकी पाठर येथे वैविध्य-पूर्ण कार्यक्रम घेण्यात आले.

१. विज्ञानाची प्रयोगशाळा आणि प्रदर्शन

२. गांधीजींच्या विचारांवर निबंध स्पर्धा

३. जैविक विविधता रांगोळी

४. चित्रकला स्पर्धा

५. मुलींसाठी स्व-रक्षण प्रशिक्षण

६. मुलांसाठी मैदानी खेळ. लांब उडी आणि धावणे यांचे प्रशिक्षण

७. वाचन आणि भाषण कौशल्य विकास कार्यक्रम

८. महाविद्यालयाच्या जिमखाना टीम ने आश्रमशाळा विद्यार्थ्यांसाठी विविध क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या.

९. समारोप कार्यक्रमाचे आयोजन प्रथमेश्वर आणि गणेश या विद्यार्थ्यांनी केले. या अंतर्गत पथनाट्य,गाणी शाळेतल्या मुलांची बसवून घेतली.

श्रमदान- शिबिरांतर्गत १ वनराई बंधारा पाणी अडविण्यासाठी आणि ६ दगडी बंधारे मृदेची झीज रोखण्यासाठीही बांधण्यात आले.

या शिबिरासाठी प्रमुख मार्गदर्शन प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांचे लाभले. तसेच कार्यक्रम अधिकारी

श्री. शिवाजी नाईक, प्रो. मनीषा पांडे आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे सदस्य डॉ. विनोद चांदवानी, डॉ. सागर ठक्कर, प्रो. मुग्धा देसाई, प्रो. रुता वैती, श्री. प्रकाश जंगले तसेच प्रो. प्रियंवदा टोकेकर आणि प्रो. नीता पाठक आणि उपप्राचार्य प्रो. मोनिका देशपांडे आणि श्री सुभाष शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

आश्रमशाळा अधीक्षक श्री. धीरज पाटील आणि आश्रमशाळा प्राचार्य यांचेही विशेष आभार.

माजी विद्यार्थी श्री. अविनाश गुंडकर, श्री. विवेक पाटील आणि श्री. राकेश पाटील, प्रो. महेश पाटील, प्रो. अनिल भाबड, प्रो. अर्चना डोईफोडे, सौ. रोहिणी कोळी यांनी शिबिरात विशेष सहभाग दर्शविला.

**'ऋत' या वृत्तपत्राचे प्रकाशन**



दि. १७ जानेवारी २०१९ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या वृत्त विद्या व संज्ञापन विभागाच्या 'ऋत' नावाच्या अनियतकालिकाचे प्रकाशन ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक श्री अंबरीश मिश्र यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ विजय बेडेकर उपस्थित होते. बीएमएम या विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांनी हे वृत्तपत्र संपादीत केलं असून एकूण १६ पानांमध्ये विद्यार्थ्यांचे मराठी, इंग्रजी, संस्कृत व हिंदी भाषेतील अभ्यासपूर्ण लेख समाविष्ट केले आहेत.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक म्हणाल्या की, विद्यार्थ्यांना लेखनाची व चिंतनाची अविरत सवय लागण्यासाठी ऋत हे वृत्तपत्र काम करते. संवेदनशील मनाने सृजन करता करता एकदिवस आपल्या विद्यार्थ्यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळेल अशी आशा त्यांनी व्यक्त केली. डॉ. बेडेकर यांनी विद्यार्थ्यांना लेखनाच्या बहुआयामी शैलीबद्दल सांगत दस्तऐवजीकरण करण्यात आपण मागे पडू नये असा सल्ला दिला. ऋत या वृत्तपत्राच्या नावाच्या अर्थाची उकल करत, 'समतोल विचार व समतोल आचार हाच ऋत चा गाभा आहे' असे ते म्हणाले. या वृत्तपत्राच्या प्रकाशन समयी ज्येष्ठ पत्रकार श्री अंबरीश मिश्र यांनी 'सृजनाचे डोहाळे' या विषयावर आपले विचार मांडले.

**पाऊस कधीचा पडतो। झाडांची हलती पाने।**
**हलकेच जाग मज आली। दुःखाच्या मंदसुराने।।**

या कवी ग्रेसच्या ओळींचा दाखला देत सृजनशील लेखक होण्यासाठी दुःखाचा आवाका व भान यायला हवं असं ते म्हणाले. विद्यार्थ्यांनी सर्व गोष्टींसोबत आपल्या भाषेकडे व अभिव्यक्तीकडे सुद्धा लक्ष द्यावे. संवेदनशील मन व विनयशील आचार या गुणांनी युक्त झाल्यासच सृजनाकडे जाता येईल असं ते म्हणाले. या वृत्तपत्राचे संपादन अपूर्वा बोधारे, नमिशा कोंडसकर व ओंकार मुळ्ये या विद्यार्थांनी प्रा. प्रशांत धर्माधिकारी, डॉ. विमुक्ता राजे व डॉ. महेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली केले.

**आनंदाचा मागोवा विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद**

ठाण्याच्या जोशी-बेडेकर महाविद्यालयात १८ आणि १९ जानेवारी रोजी 'आनंदाचा मागोवा' या विषयावर दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. याप्रसंगी अनेक विद्वानांची उपस्थिती लाभली. यामध्ये डॉ. आनंद नाडकर्णी आणि

डॉ. प्रदीप गोखले यांचे महत्त्वाचे मार्गदर्शन बीजभाषणात मिळाले. भारताबाहेरील ज्येष्ठ अभ्यासक डॉ. फ्रॅन्कलिन ॲबॉट, डॉ. मायकल शूज यांचीही मोलाची उपस्थिती लाभली.




महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्र नाईक आणि इतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. उद्‌घाटन सत्रामध्ये प्राचार्या डॉ. नाईक यांनी परिषदेचा विषय 'आनंदाचा मागोवा' याबद्दल अत्यंत थोडक्यात मुद्देसूदपणे सांगितले. त्या म्हणाल्या, 'या वर्षी महाविद्यालयातील सर्वच कार्यक्रमांचा विषय 'आनंद' हा असून आपण सर्वच संपूर्ण वर्षभरात आनंदाच्या दिशेने वाटचाल करत होतो. पुराणातील वेदाचा आधार घेत त्या म्हणाल्या, ''प्रत्येक जण आनंदी असला पाहिजे, कोणत्याच जीवाला आयुष्यात दुःख मिळू नये.''

याप्रसंगी डॉ. आनंद नाडकर्णी यांनी आनंदाचे दोन प्रकार सांगितले 'अनुभूती' आणि 'अभिव्यक्ती'. 'अनुभूती' म्हणजे ऊर्जा आणि ऊर्जेचा परिणाम म्हणून अंतरंगातून येणारे भाव म्हणजे 'अभिव्यक्ती'. अनुभूतीशिवाय अभिव्यक्ती असू शकत नाही. तसेच त्यांनी सुख, कैवल्य, साधना यांसारख्या विषयांवरही भाष्य केले. आनंद ही संकल्पना मनुष्य जीवनात कधीपासून आली, त्याचा इतिहास आणि निरनिराळ्या प्रकारांबद्दल त्यांनी सविस्तर सांगितले.

अशा रीतीने 'तत्त्वज्ञान, मानसशास्त्र व समुपदेशन विभागाने' आयोजित केलेल्या या आंतरराष्ट्रीय परिषदेचे हे १५ वे वर्ष आहे. डॉ. उमा शंकर, डॉ. सुभाषचंद्र भेळके, डॉ. नीता मेहता, डॉ. अविनाश डिसोझा आणि डॉ. आकाश सिंग राठोर यांचाही परिषदेत समावेश आहे.

**डुबेरे: थोरले बाजीराव पेशवे यांचे जन्मस्थान**



दि. २४ जानेवारी २०१९, महाविद्यालयाच्या मराठी व इतिहास विभागातर्फे डुबेरे थोरले बाजीराव पेशवे यांचे जन्मस्थान या विषयावर प्रा. चंद्रशेखर बर्वे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्रा. बर्वे हे जीवशास्त्राचे प्राध्यापक असून पेशव्यांचे ९वे वंशज आहेत. प्रा. बर्वे म्हणाले की, नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील डुबेरे या गावच्या बर्वे वाड्यामध्ये श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांचा जन्म १८ ऑगस्ट १७०० साली झाला. मराठा रियासतीचा सुवर्णकाळ हा थोरले बाजीराव पेशवे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने अनुभवला. आज आधुनिक पिढीला पेशव्यांच्या कार्याचा व जन्मस्थळाचा विसर पडला आहे अशी खंत त्यांनी व्यक्त केली. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी इतिहासाचे डोळस आकलन करण्याचा सल्ला आपल्या प्रास्ताविकात दिला. या प्रसंगी इतिहासामध्ये Fighting Peshwa असा थोरल्या बाजीराव

पेशवे यांचा उल्लेख आहे असे प्रतिपादन महाविद्यालयाच्या इतिहास विभागाचे प्रमुख प्रा. सुभाष शिंदे म्हणाले. कार्यक्रमास प्रा. नारायण बारसे, प्रा. शिरीष पाटील, डॉ. महेश पाटील, प्रा. इंद्राणी रॉय, प्रा. संतोष राणे, प्रा. समीर पवार, प्रा. उमा अय्यर, प्रा. प्रशांत धर्माधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन प्रा. अनिल भाबड यांनी केले.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

१) डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालय वडाळा, मुंबई आणि महाराष्ट्र राज्य मानवी अधिकार आयोग यांनी दिनांक २३ ऑक्टोबर, २०१८ रोजी एक दिवसीय राष्ट्रीय परिषद आयोजित केली होती. याचा विषय हा 'लैंगिक न्याय : सामाजिक, सांस्कृतिक व कायदेशीर' असा होता. प्रभारी प्राचार्या श्रीविद्या जयकुमार यांना राजकारणातील लैंगिक न्याय या विषयावर वक्ता म्हणून पाचारण करण्यात आले होते.

२) वि. प्र. मंडळाचे बा. ना. बांदोडकर महाविद्यालयाचे दिनांक ५ व ६ डिसेंबर २०१८ रोजी आयोजित केलेल्या राष्ट्रीय सिंपोझियम "Educational Ethics and Ethics in Research" यावेळी प्रभारी प्राचार्या श्रीविद्या जयकुमार यांनी "Code of ethical coduct in higher education in India: Issues and concerns" या विषयावर व्याख्यान दिले.

३) दिनांक १५ डिसेंबर, २०१८ रोजी प्रभारी प्राचार्या श्रीविद्या जयकुमर यांचा पीएचडीचा 'व्हायवा' सादरीकरण झाले. त्यांचा विषय "Status of Politcal Rights in India - a human rights perspective." असा होता. यावेळी मुंबई विद्यापीठाने सदर पदवी अर्पित केली.

४) दिनांक ३ डिसेंबर, २०१८ ला महाविद्यालयाचे विद्यार्थी ॲड. यतिन पंडित, डॉ. राजर्षी गांधी व सुखराम बिसेन यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई येथे सेबी (SEBI) या संस्थेस भेट दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी सेबी संस्थेची प्रक्रिया समजून घेतली.

५) विशेष मराठी शिकवणी वर्ग : विद्यार्थ्यांच्या विनंतीवरून महाविद्यालयाने सत्र III व सत्र V च्या विषयावर मराठीमधून विशेष शिकवणी वर्गाचे आयोजन केले होते.

सत्र III साठी प्रा. विनोद एच. वाघ 'प्रशासकीय कायद्यावर' ॲड. यतिन पंडित यांनी 'कंपनी कायद्यां'वर तर ॲड. दातार यांनी 'संपत्ती हस्तातंरण' या विषयावर वर्ग घेतले.

तसेच सत्र पाचसाठी प्रा. विनोद वाघ यांनी 'फौजदारी प्रक्रिया संहिता' प्र. प्राचार्या श्रीविद्या जयकुमार व प्रा. विनोद वाघ यांनी 'आंतरराष्ट्रीय कायदा व मानवी हक्क' डॉ. महेश बर्वे यांनी 'कायद्याचे अर्थबोधन' तर प्रा. रुपाली यांनी 'दिवाणी प्रक्रिया संहिता' या विषयावर वर्ग घेतले.

६) विशेष व्याख्यान :

१. १३ ऑक्टोबर – जनहित याचिकेचा मसुदा – ॲड. भारत खन्ना

२. १७ नोव्हेंबर – अभिरूप न्यायालयाचे सादरीकरण –बलाजी एन. व प्रज्ञा सानस तृतीय विधी विद्यार्थी

३. १५ डिसेंबर – IPR मधील वकिली करीअर – ॲड. नीतिन उपाध्ये

४. ८ डिसेंबर – कौटुंबिक हिंसा कायदा – ॲड. रुपाली

७) प्रा. विनोद एच. वाघ यांच्या पुस्तकाचे प्रकाशन.

प्रा. विनोद एच. वाघ यांच्या "Legal Language and Legal Writing" या पुस्तकाचे प्रकाशन प्रभारी

प्राचार्या जयमंगल धनराज, डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालय वडाळा, मुंबई व प्रभारी प्राचार्या श्रीविद्या जयकुमार यांच्या हस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रम हा दि. ८ डिसेंबर रोजी घेण्यात आला.

८) फ्रेशर अभिरूप न्यायालय स्पर्धा

प्रथम विधीच्या विद्यार्थ्यांसाठी दि. २६ नोव्हेंबर २०१८ रोजी अभिरूप न्यायालय स्पर्धा घेण्यात आली होती. अपकृत्य विषयक कायद्यावर आधारित या स्पर्धेसाठी ॲड. पायक जज म्हणून नियुक्त करण्यात आले होते. सदर स्पर्धेमध्ये खालील विद्यार्थ्यांनी बक्षीस मिळविले.

१) कु. अनुषा पठाण – प्रथम क्रमांक व यंगेस्ट मुटर

२) कु. लॉरेन ब्रॅग – द्वितीय क्रमांक

३) कु. पल्लवी दुबे व कु. अमित शुक्ला – तृतीय क्रमांक

४) कु. यश पावले उत्कृष्ट मसुदा

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

**'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनात उत्साहात साजरा**



विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतन तर्फे 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' दि.०१ जानेवारी २०१९ ते १५ जानेवारी २०१९ रोजी तंत्रनिकेतनात उत्साहात साजरा करण्यात आला. या कालावधीत मराठी भाषेतील ग्रंथांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. मराठी भाषेतील विविध ग्रंथांचा त्यामध्ये समावेश होता. त्यामध्ये संत वाङ्मय, कादंबरी, काव्य, नाटक, समीक्षात्मक ग्रंथ, चरित्रे इत्यादी ग्रंथ प्रदर्शनात मांडण्यात आली होती. सदरचे प्रदर्शन ग्रंथालय आणि माहिती केंद्र समोरील खुल्या जागेत भरवण्यात आले होते.

सदरच्या प्रदर्शनाचा लाभ सर्व विद्यार्थी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी घेतला आणि मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात पार पडला.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

१ डिसेंबर : आशिदा इलेक्ट्रॉनिक्समध्ये उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार वितरण समारंभासाठी ब्रीम्स चे संचालक डॉ. नीतिन जोशी आणि प्राध्यपिका डॉ. स्मिता जपे यांना अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले.

प्रा. दीप्ती पेरीवाल यांनी वैनेत्य सॉफ्टवेअर कन्सल्टन्सी प्रा. लि. चे सी ई ओ श्री. शशांक टिळक यांचे रिटेल डिस्ट्रीब्यूशन गेम या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन केले.



५, ६ डिसेंबरः डॉ. नीतिन जोशी यांना बांदोडकर महाविद्यालयातील एथिक्स इन एज्युकेशन अँड रिसर्च या विषयावरील परिषदेसाठी तज्ज्ञ व्याख्याते म्हणून निमंत्रित करण्यात आले.



७ डिसेंबर: डॉ. नीतिन जोशी यांना बोंदोडकर कॉलेज फॉर इनोव्हेशन सेंटर येथे प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले.

८ डिसेंबर: डॉ. सुखदा यांनी ब्रीम्समध्ये माजी विद्यार्थी सम्मेलनाचे आयोजन केले.



८ डिसेंबर: डॉ. स्मिता जपे यांना इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड कम्प्यूटर स्टडीज मधील वित्त शाखेच्या विद्यार्थ्यांची प्रकल्प मुलाखत घेण्यासाठी आमंत्रित करण्यात आले.

८ आणि ९ डिसेंबर: डॉ मीनाक्षी, डॉ. पल्लवी आणि प्रा. कृणाल एस.के.सोमैया कॉलेज मध्ये आय.आय.एम. अहमदाबाद द्वारा आयोजित 'सायकोमेट्रिक्स अँड स्केल डेव्हलपमेंट इन सोशल सायन्स' या कार्यशाळेला उपस्थित राहिले.



११ डिसेंबर: डॉ. नीतिन जोशी यांना व्हीटीयू युनिव्हर्सिटी बंगलोर येथे पीएचडी च्या विद्यार्थ्यांची प्रकल्प मुलाखत घेण्यासाठी निमंत्रित करण्यात आले.

१२ डिसेंबर: प्रा. कृणाल, प्रा. दीप्ती आणि श्री. अमित यांनी यशस्वीपणे युथ इनोवेशन चॅलेंज २०१८ चे आयोजन केले, ठाणे आणि मुंबईच्या विविध महाविद्यालयातील १७ संघ आणि ५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. युथ इनोवेशन चॅलेंज २०१८ मधील मॉक स्टॉक स्पर्धा डॉ. मीनाक्षी यांनी यशस्वीपणे आयोजित केली.



१५ डिसेंबर: प्रा. कृणाल यांनी पुणे येथील सिम्बायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ बिझिनेस द्वारा आयोजित व्यवसाय व्यवस्थापनातील प्रगती या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेत ट्रेंड ऑफ पफरी इन ॲडव्हर्टायझिंग – ए

बिबिलोमेट्रिक ॲनालिसिस या विषयावर आपल्या शोध निबंधाचे सादरीकरण केले.

१९ डिसेंबर: ब्रीम्स मधील एमएमएसच्या द्वितीय वर्षातील विद्यार्थी पियुष चौधरी आणि लिनीश मकाजी यांनी आय ई एस एम सी आर सी बांद्रा येथे आयोजित क्रॅक इट–२०१८ स्पर्धा जिंकली.

२२ डिसेंबर: डॉ पल्लवी आणि प्रा. कृणाल यांनी ब्रीम्स मध्ये पदवीधर विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन सेमिनार आयोजित केले.

२८ डिसेंबर: टांझानियाच्या प्रतिनिधींनी ब्रीम्सला भेट दिली आणि खनिजांचा विशेषतः 'तांब्याचा कमोडिटी व्यापार' या विषयावर एक परिपूर्ण चर्चा आयोजित करण्यात आली.



२९ डिसेंबर: श्री संजय सपकाळ यांनी प्राध्यापकांसाठी सेज प्रकाशनातर्फे इ. पुस्तके, संसाधने, केस स्टडी आणि संशोधन पद्धतींवरील व्याख्यान आयोजित केले.

२९ डिसेंबर: डॉ. स्मिता जपे आणि डॉ. मीनाक्षी यांनी एमएमएस द्वितीय वर्षाच्या (वित्त शाखेच्या) विद्यार्थ्यांसाठी लर्नबीझ सिम्युलेशन सॉफ्टवेअरवर आधारित एका सत्राचे आयोजन केले.

३१ डिसेंबर: डॉ. मीनाक्षी आणि डॉ. पल्लवी यांनी ब्रीम्स मधील प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांसाठी डिसेंबर महिन्यातील वाढदिवसाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले.

**स्पर्धा समर्थ व्यक्तिमत्त्व निर्माण करतात. स्पर्धा वेगळेपण सिद्ध करतात.**

ठाणे येथील व्ही.पी.एम.च्या डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे विद्यार्थी सुश्री लिनिष मकाजी आणि श्री पीयूष चौधरी, मुंबई स्टॉक एक्सचेंज द्वारे आयोजित स्टॉक टोरेरो २०१८ स्पर्धेत विजयी.



स्पर्धांमुळे मानवाची उत्क्रांती झाली आहे. आणि हे एक प्रस्थापित सत्य आहे की एखाद्या व्यक्तीतील सर्वोत्तम गुण बाहेर काढण्यासाठी स्पर्धा ही आवश्यक आहे.स्पर्धा स्पर्धकांमध्ये समर्थ व्यक्तिमत्त्व, लवचिकता, दृढनिश्चय, संघ भावना, विनोदबुद्धी आणि विनयशीलता निर्माण करतात आणि स्पर्धा जेव्हा थेट सिम्युलेशनवर (प्रत्यक्ष स्टॉक एक्सचेंज मध्ये स्टॉक ट्रेडिंग सॉफ्टवेअरवर) आधारित असेल तेव्हा ती स्पर्धा एक बेजोड शिक्षण अनुभव देते. स्टॉक टोरेरो या स्पर्धेचे हे ७ वे पर्व. आंतरराष्ट्रीय संमेलन सभागृहात आयोजित केल्या गेलेल्या या स्पर्धेसाठी स्टॉक ट्रेडिंग कामकाजाचे आभासी वातावरण तयार केले गेले होते. या वर्षी आयआयटी पवई, आयआयटी रुड़की, एन. एल. डालमिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, प्रिन्स. एल. एन. वेलिंगकर व्यवस्थापन विकास व संशोधन संस्था, एनएमआयएमएस ग्लोबल ॲक्सेस एससीई,

व्हीजीएसओएम-आयआयटी, एच. आर. कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन संस्था, खारघर, आर. के. व्यवस्थापन व संशोधन संस्था, चेतना व्यवस्थापन व संशोधन संस्था, गुरू नानक इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, जय हिंद कॉलेज व बीएसई संस्थेच्या मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांनीही या इंट्राडे सिम्युलेटेड ट्रेडिंग स्पर्धेत भाग घेतला.

डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे संचालक डॉ. नीतिन जोशी या यशाबद्दल बोलताना अभिमानाने आणि आनंदाने म्हणाले की, 'तुम्ही जेव्हा कोणत्याही आव्हानाला सामोरे जाता तेव्हा ते तुम्हाला मजबूत करते. जिंकणे किंवा हरणे हे दुय्यम आहे. आम्हाला आमच्या विद्यार्थ्यांचा अभिमान वाटतो. आमच्या विद्यार्थ्यांना आणि आम्हाला माहीत आहे की, स्पर्धेद्वारे ते स्वतःला आव्हान देण्यासाठी, स्वतःचा शोध घेण्यासाठी आणि विकास करण्यासाठी एक मंच मिळवतात.'

भविष्यातील गतिशील व्यवस्थापन संघटनांना व व्यावसायिकांना, नेतृत्व, धोरण, नवकल्पना आणि माणसांची योग्य जाण असणाऱ्या व्यवस्थापन तज्ज्ञांची आवश्यकता असते. म्हणूनच ब्रीम्स अधिक प्रभावी उद्योजक, व्यवस्थापन व्यावसायिक तयार करण्यासाठी परिणामांवर आधारित शिक्षणपद्धतीवर भर देते, केवळ पारंपरिक शिक्षणावर नाही.

डॉ. विजय बेडेकर -(अध्यक्ष, विप्रमं, ठाणे) म्हणाले की, 'व्यावसायिक वातावरणातील बदलांनुसार शिक्षणक्षेत्र विकसित होत आहे. अध्ययन-अध्यापनाचा योग्य दृष्टीकोन, पद्धतशीर प्रक्रिया आणि जागतिक पद्धती अवलंबून उद्याच्या व्यावसायिक नेत्यांना तयार करण्याचे ध्येय ब्रीम्सने निश्चित केले आहे.'

२१ व्या शतकातील, टीकात्मक विचार करण्याची क्षमता, स्वीकार क्षमता, चपळता, पुढाकार घेण्याची क्षमता, निर्णय घेण्याची क्षमता, निर्मितीक्षमता आणि समस्या सोडविण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये बिंबवण्यावर ब्रीम्सने लक्ष केंद्रित केले आहे.

•••

---

(पृष्ठ क्र. ३० वरून – **चंपाषष्ठी**)

बाजरी उष्ण, अग्निदीपक भूक वाढवणारी बल देणारी आणि कफनाशक आहे. परंतु ती रुक्ष असल्यामुळे बाजरीची भागरी तीळ लावून करण्याची व जोडीला वांग्याची भाजी किंवा भरीत करून खाण्याची पद्धत आहे. बाजरी रुक्ष आहे पण तीळ स्निग्ध असल्यामुळे बाधत नाही.

तीळ केस वाढण्यासाठी, काळे व मऊ होण्यासाठी उपयुक्त आहेत.

वांगी स्वादिष्ट, वात-कफनाशक, अग्निदीपक आहेत. मुगाची खिचडी सर्व ऋतूंमध्ये व सर्व आजारांमध्ये पौष्टिक आणि पथ्यकर आहे. धातूवृद्धीकर आहे. रक्तपित्त, कफरोग, तृष्णा ज्वर दाह, व्रण आणि डोकेदुखी यावर उपयुक्त आहे.

या दिवसात सकाळीच लवकर भूक लागते. त्यामुळे धनुर्मासात सूर्योदय झाला की जेवण करावे असे सांगितले आहे.

असा हा सर्व मासांमध्ये मार्गशीर्ष महिना सांगितला आहे.

**– डॉ. शैलजा व्यंकट धर्माधिकारी**

•••

---

सामान्य माणसाचा आयुष्याबद्दलचा जो भ्रम असतो तो घालवलात, तर तुम्ही त्याचे सुख हिरावून घेता! – हेन्रिक इब्सेन

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय)**

आहेतच, पण त्यावर दरवर्षी काही शेकड्यांनी शोधनिबंधही लिहिले जातात. गार्गसंहिता ही अशीच १-२ ऱ्या शतकातील ज्योतिष /ग्रहगणितावरची महत्त्वाची पोथी डॉ. यानो यांच्या मार्गदर्शनाखाली जपानच्या क्योटो विद्यापीठात डॉ. बिल मॅक हे त्यावर संशोधन करत आहेत. अशा अनेक संहिता आज संशोधनाच्या प्रतिक्षेत आहेत. शं. बा. दीक्षित या अभ्यासकांनी या विषयावर आणि भारतीय ग्रहगणिताच्या अभ्यासकांवर १८९६ साली 'भारतीय ज्योतिषाचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास' हा संशोधनपर ग्रंथ लिहिला आहे. प्रत्येकाने वाचावा असा या शास्त्राच्या इतिहासाचा हा प्रमाणग्रंथ आहे. त्याचे महत्त्व लक्षात घेऊन भारत सरकारने त्याचे हिंदी व इंग्रजीमध्ये भाषांतर करून घेतले आहे.

दीक्षितांकडून स्फूर्ती घेऊन २० व्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये सुधाकर द्विवेदी, आणि विसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये डेव्हीड प्रींग्री (David Pingree) यांनी भारतीय ग्रहगणिती व त्याच्या इतिहासावरती पाच खंडांमध्ये Census of the exact sciences in Sanskrut हा ग्रंथ लिहिला.

भारताने कालमापन क्षेत्रामध्ये प्रचंड प्रगती केली होती. भारतीय महिन्यांची नावे ही नक्षत्रांवरून घेतली आहेत. सर्व भारतीय सण आणि उत्सव हे निसर्गाच्या कुठल्यातरी बदलांशी जोडले गेले आहेत. यावर आधारितच भारतीय ऋतुंची आखणी दिसून येते. ऋतुंना भारतीय कालगणनेमध्ये महत्त्वाचे स्थान आहे.

लोकमान्य टिळक हे राजकारणी म्हणून आपल्याला माहिती असले तरी ते थोर गणिती होते. 'ऋतू' आणि 'कालमापन' यांचा परस्पर संबंध त्यांना चांगला समजला होता. भगवद्गीतेतील दहाव्या अध्यायातील ३५ व्या श्लोकात, 'मासामां मार्गशीर्षोऽहं ऋतुणां कुसुमाकरः' असे म्हटले आहे (१०.३५). या श्लोकामधील 'वसंत' ऋतू व 'मार्गशीर्ष' महिन्याच्या संदर्भावर लोकमान्य टिळक थबकले. 'महिन्यांमध्ये मार्गशीर्ष मी', व 'ऋतुंमध्ये वसंतऋतू मी' अशी विभूती भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात. सद्यपरिस्थितीप्रमाणे नवीन वर्षाची सुरुवात ही 'चैत्र' महिन्यात व 'वसंत'ऋतुने होते. मग श्रीकृष्णाने महिन्यामध्ये 'मार्गशीर्ष' हे नाव का घेतले असावे असा प्रश्न टिळकांना पडला. या प्रश्नाचे उत्तर ते शोधू लागले. यातूनच त्यांनी वसंतऋतू, मार्गशीर्ष महिन्यात केव्हा असू शकतो याचे गणित मांडायला सुरुवात केली. अभ्यासकांनी याकरता त्यांचा 'ओरायन' हा ग्रंथ वाचायला हवा. आपले कालमापन किती शास्त्र- शुद्ध आहे याकरता दुसऱ्या पुराव्याची गरज नाही.

इंग्रज १६ व्या शतकात भारतात आले असले तरी, त्यांच्या वसाहतवादाची सुरुवात ही १९ व्या शतकात झाली. सर्वसामान्य समाजाला नियंत्रित करणारी न्यायव्यवस्था, महसूल, शिक्षण याची सर्व सूत्रे याच काळामध्ये इंग्रजांच्या हातात गेली. साहाजिकच इंग्रजांच्या कालगणनेपासून, इतर सगळ्या त्यांच्या व्यवस्था या पाश्चिमात्य संस्कृती व मानसिकतेशी मिळत्याजुळत्या होत्या. याचवेळी युरोपमध्ये वैज्ञानिक, आणि औद्योगिक क्रांतीही प्रस्थापित झाली होती.

मसाल्याच्या पदार्थांच्या निर्यातीसाठी भारतात आलेले इंग्रज, १९ व्या शतकात औद्योगिकीकरणातून निर्माण झालेल्या वस्तू भारतात आयात करू लागले. 'खेडे'केंद्री असलेली भारतीय अर्थव्यवस्था, व समाजव्यवस्था यामुळे संपूर्णतः खिळखिळी झाली. त्यामुळे त्यात काही अपप्रवृत्तीही निर्माण झाल्या. अर्थातच या उणिवांवरती बोट ठेवीत सुधारणांना सुरुवात झाली. उणीवा दूर होण्याबरोबरच, मूळ भारतीय संकल्पनाच उद्ध्वस्त व्हायला लागल्या. परंपरा म्हणजे मागासलेपणा, आणि पाश्चिमात्य विचार आणि शिक्षण म्हणजे प्रगती आणि आधुनिकता, हे समीकरण याचवेळी प्रस्थापित व्हायला सुरुवात झाली. विस्कळीत झालेले उद्योगधंदे, त्यावर आधारित कोलमडणारी अर्थव्यवस्था यामुळे या मानसिकतेवर शिक्कामोर्तब व्हायला लागले.

मेकॉलेप्रणीत नवीन शिक्षण प्रणालीने या बदलाला प्रचंड सहाय्य केले. ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी याचा सर्वात जास्त फायदा घेतला. परंपरांची मोडतोड म्हणजेच सुधारणा, या मंत्राचा आधार घेत इंग्रजांनी आपल्या सांस्कृतिक वसाहतवादाची मुहूर्तमेढ रचायला सुरुवात केली.

याचवेळी हेच इंग्रज भारतीय साहित्य, जीवनशैली आणि गणितादी विज्ञानाचा अभ्यास करू लागले. त्याकरता ते संस्कृत शिकले. याच्या अभ्यासाकरता त्यांनी संशोधन संस्था काढल्या. भारतीय संस्कृती 'सृजना'मध्ये कुठेही कमी नव्हती हेही त्यांनी मान्य केले. तरीही सुधारणांच्या नावाखाली सर्वच भारतीय संस्कृती, सामाजिक आणि वैज्ञानिक विचार हा पुराणकथांमध्ये समाविष्ट झाला.

प्राचीनकाळामध्ये भारतामध्येही अनेक बदल होत होते. वैदिक भारतामध्ये बौद्ध, जैन असे मत/विचार प्रवाहही निर्माण झाले. पण त्या सगळ्यांच्या मुळाशी भारतीय तत्त्वज्ञान म्हणजे दर्शनशास्त्रे होती. त्यांच्या भाषेमध्ये, वेषामध्ये परिवर्तन होत होते पण तो भारतीय संस्कृतीच्या विकासाचा टप्पा होता. १९ व्या शतकात वसाहतवाद जे करत होते ते संपूर्णतः वेगळे होते. भारतीय विचार त्यामधून लोप होत होता. पाश्चिमात्य विचारसरणीला सोयिस्कर व्यवस्थांचे त्यावर रोपण होत होते.

भौगोलिक वसाहतवाद संपवता येतो पण सांस्कृतिक वसाहतवाद खोलवर रुजलेला असतो. तो मूळ संस्कृतीलाच संपवतो.

भाषा, वेष, विज्ञान हे सगळे संस्कृतीचेच कंगोरे असतात. त्यामध्ये बदलही संस्कृतीला सुसंगत होत असतात. 'वसाहतवाद' नुसता बदल करत नाही, तर संपूर्ण व्यवस्थेचे तो परिवर्तन करतो. आपण स्वीकारलेले आजचे पाश्चिमात्य कालमापन आणि भारतामध्ये हजारो वर्षांच्या परंपरेने निर्माण झालेले कालमापन (पंचांग), हे 'वसाहतवाद' काय करू शकतो याचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

भारतीय पंचांग हे ग्रहगणितावर आधारित आहे. निसर्ग, परिसर आणि संस्कृतीचे त्यात प्रतिबिंब आहे. आपण वसाहतवादाच्या प्रभावाखाली स्वीकारलेल्या पश्चिमात्य कालगणनेपेक्षा ते काकणभरही कमी वैज्ञानिक नाही. फक्त 'दिनांक' आणि 'वारा' पलीकडे दैनंदिन जिवनाला लागणारी बरीच माहिती आपले पंचांग देते.

भारतीय संस्कृती व तत्त्वज्ञानाचा प्रभाव मध्यपूर्व व दक्षिणपूर्व आशिया खंडामध्ये मोठ्याप्रमाणावर दिसून येतो. त्यांच्या भाषांमधून अनेक संस्कृत शब्द आढळतात. त्यांचे सण आणि उत्सव रामायण, महाभारतादी कथांवर आधारित आहेत. त्यांचे कालमापन देखील हिंदू परंपरेनुसार आहे. बाली, इंडोनेशियामध्ये आजही या कालगणनेचा प्रभाव दिसून येतो. तरीही त्याला भारतीय वसाहतवाद म्हणून संबोधले जात नाही. याचे मुख्य कारण म्हणजे भारताने तिथल्या परंपरांवरती कुठेही अतिक्रमण केले नाही. त्यांच्या विकासाकरता अधिक प्रगत भारतीय परंपरा त्यांना घ्यायला लागल्या.

'इंग्रजी वसाहतवाद' हा त्यापेक्षा वेगळा आहे. भारताला एक विकसित परंपरा होती. समजा भारतात वसाहतवाद आला नसता, तर भारतानेही आधुनिक व्यवस्थांचा स्वीकार भारतीय व्यवस्थेमध्ये करून घेतला असता. 'वसाहतवाद' मूळ विचार संपवतो आणि संपूर्णतः भिन्न संस्कृतीचे त्यावर रोपण करतो. त्यामुळे पाश्चिमात्यांचे अनुकरण, व स्वतःच्या संस्कृतीबद्दल कायम हीनपणा यातून 'खेचर' संस्कृती निर्माण होते. अशा खेचर संस्कृतीतून 'सृजनशीलता' कधीच निर्माण होऊ शकत नाही; शिल्लक राहते ते फक्त अनुकरण. भारतीय कालमापनाला आपण दिलेली सोडचिठ्ठी हे याचे चांगले उदाहरण आहे.

**डॉ. विजय बेडेकर**

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.